PODAR INTERNATIONAL SCHOOL
MORE THAN GRADES
Since 1927

# PODAR INTERNATIONAL SCHOOL
## CBSE, HINGOLI

School Code: 30711

Affi.No. 1130784

# MEDIA COVERAGE 2021-22

## Guidance by
## Mr. S.K.Bhardwaj
## (Principal )

*Media coverage is mirror of the school.*



# media coverage

PODAR INTERNATIONAL SCHOOL
MORE THAN GRADES
Since 1927

**2020-21**

*'A good newspaper is a nation talking to itself'.*

# NEW BUILDING PODAR HINGOLI 2



# वर्तमानपत्र आणि पत्रकार बंधूचे मनःपूर्वक धन्यवाद

वर्तमानपत्र हे समाजमनाचा आरसा असतो आणि ते लोकांचे मनोध्येर्य आणि आत्मविश्वास वाढवण्याचे कार्य करतात . पोदार इंटरनॅशनल स्कूल हिंगोलीच्या प्रांगणात घेण्यात येणारे विविध उपक्रम आणि कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात पसिद्धी देण्याचे कार्य आघाडीचे वर्तमानपत्र आणि पत्रकार बंधू करत आहेत .

शाळेत होणाऱ्या विविध सांस्कृतीक उपक्रमाला वर्तमान पत्रातून प्रसिद्धी देऊन शाळेचे नाव उज्वल करण्यात हिंगोलीतील वर्तमानपत्र आणि पत्रकार बंधूचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. असेच सर्वांचे अनमोल सहकार्य लाभून शाळेची यशस्वी वाटचाल व्हावी. या माध्यमातून मी शाळेचा प्रमुख म्हणून सर्व पालक ,पत्रकारबंधु , आमचे सर्व हितचिंतक, सहकारी,प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे जोडल्या गेलेल्या सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करतो.



धन्यवाद...





# media coverage

2021-22

PODAR INTERNATIONAL SCHOOL
MORE THAN GRADES
Since 1927

## पोदार शाळेत घेण्यात येणारे विविध उपक्रम आणि कार्यक्रमाच्या बातम्या प्रसिद्ध करणाऱ्या वर्तमानपत्र आणि पत्रकार बंधूचे स्नेहपूर्वक आभार !

1.दैनिक लोकमत

2.दैनिक सकाळ

3.दैनिक देशोन्नती
4.दैनिक मराठवाडा केशरी
5.दैनिक तरुण भारत
6.दैनिक पुण्यनगरी
7.दैनिक लोकमत समाचार
8.दैनिक ऐकजूट
9.दैनिक लोकमत टाइम्स
10.दैनिक एकमत
11. दैनिक मराठवाडा नेता

**चंद्रकांत नांगरे**
**प्रसारमाध्यम समन्व्यक**





# media coverage

**2021-22**

PODAR INTERNATIONAL SCHOOL
MORE THAN GRADES
Since 1927

## दैनिक मराठवाडा केसरी

### पोदार मध्ये पर्यावरण पूरक होळी साजरी



**हिंगोली / प्रतिनिधी** । येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये पर्यावरणपूरक होळी साजरी करतांना विविध उपक्रम घेण्यात आले.



प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज म्हणाले की, 'अजूनही कोरोना गेलेला नाही त्यामुळे विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक होळी साजरी करतांना एकमेकांना स्नेहाचे प्रतीक म्हणून फुले भेट द्यावीत आणि एकमेकांचा आदर करावा. एकमेकांना विचारमय शुभेच्छा द्याव्यात. तसेच यावेळीस आपल्यातील सर्वोत्तम गुण विकसित करण्याची प्रतिज्ञा करावी. आपल्या मनातील नकारात्मक विचार सोडून देण्याचे त्यांनी सांगितले.



यावेळी विद्यार्थ्यांनी होळीवर अतिशय सुंदर आणि मार्गदर्शनपर चित्रे काढले. तसेच आपल्या मित्र आणि नातेवाईकांना पत्र लिहून होळीच्या शुभेच्छा देतांना होळी कशी साजरी करावी याबद्दल माहिती दिली. होळी निमित्त शाळेत विविध उपक्रम ऑनलाईन माध्यमातून घेण्यात आल्या. त्यामध्ये पहिली आणि दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी ग्रीटिंग कार्ड, तिसरी आणि चौथी साठी होलिका नृत्य, सहावीसाठी पर्यावरणपूरक होळी कशी साजरी करावी यावर पत्रलेखन असे विविध उपक्रम राबवून ऑनलाईन होळीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी होसाठी मुकेश कहाळे, संतोष दिपके आणि मोहिनी दिक्षित यांच्यासह शाळेतील शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## पुढारी

# सीबीएसईचे शैक्षणिक वर्ष १ एप्रिलपासून सुरू

**हिंगोली, पुढारी वृत्तसेवा :** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचा वार्षिक परीक्षेचा ओपन हाऊस ऑनलाईन पार पडला. तसेच ऑनलाईन पालक सभा झाली.

कोरोनामुळे मार्च २०२० पासूनच लॉकडाऊन सुरु झाले होते. तेंव्हापासूनच पोदार शाळेने ऑनलाईन क्लास माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यास सुरुवात केली होती. पोदार शाळेतील शिक्षकांनी मोठ्या मेहनतीने आणि जिद्दीने मुलांना नियमित ऑनलाईन क्लास माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले. ऑनलाईन शिक्षणात विद्यार्थ्यांना रुची निर्माण व्हावी यासाठी विविध शैक्षणिक उपक्रम घेण्यात आले. गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षेत सर्वोत्तम मार्क्स मिळवले. स्वत:ची शैक्षणिक प्रगती पाहण्यासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने ऑनलाईन उपस्थित होते. यावेळी प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज मार्गदर्शनात म्हणाले की, २१ व्या शतकातील आव्हानांचा सामना करण्यासाठी भारतातील विद्यार्थ्यांना कला-कौशल्य आधारीत शिक्षण देण्याच्या उद्देशाने गुणवत्तापूर्ण आणि मूल्य आधारीत शिक्षण देणे, विद्यार्थ्यांच्या आधुनिक युगातील शैक्षणिक गरजाची पूर्ती करणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य उज्ज्वल करणे, त्यांचे जीवन संस्कारशील बनविणे. सर्वोत्तम नागरिक घडविणे या ध्येय व धोरणाची परिपूर्तीसाठी शाळा प्रयत्न करत आहे. कोरोनामुळे जगातील सर्व शैक्षणिक संस्था बंद असतानाही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून पोदार शाळेने हिंगोली शहरात प्रथमच व्हर्चुयल क्लासद्वारे ज्ञानदानचे कार्य अविरत व पूर्ण क्षमतेने सुरू ठेवले. शाळेच्या अविरत व सूक्ष्म नियोजनामुळे विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचा देखील उत्तुंग प्रतिसाद मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

My Nanded Edition
Apr 1, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in



# media coverage

**2021-22**

PODAR INTERNATIONAL SCHOOL
MORE THAN GRADES
Since 1927

# सीबीएसईच्या शैक्षणिक वर्षाला पोदार मध्ये एक एप्रिल पासून सुरुवात

**हिंगोली/प्रतिनिधी :** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये विद्यार्थ्यांचा वार्षिक परीक्षेचा ओपन हाऊस ऑनलाईन बुधवारी पार पडला, तसेच पालक सभेचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते. यावेळी सिबीएससीच्या २१-२२ या शैक्षणिक वर्षाला एक एप्रिल पासून सुरवात होणार असल्याचे पालकांना सांगितले.

कोरोनामुळे मार्च २०20 पासूनच लॉकडाऊन सुरु झाले होते, आणि तेंव्हापासूनच पोदार शाळेने ऑनलाईन क्लासच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यास सुरुवात केली होती. पोदार शाळेतील शिक्षकांनी मोठ्या मेहनतीने आणि जिद्दीने मुलांना नियमितपणे ऑनलाईन क्लासच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले. ऑनलाईन शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना रुची निर्माण व्हावी यासाठी विविध शैक्षणिक उपक्रम घेण्यात आले. गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे विद्यार्थींना वार्षिक परीक्षेत सर्वोत्तम मार्क्स मिळवले. स्वतःची शैक्षणिक प्रगती पाहण्यासाठी विद्यार्थी मोठ्या आनंदाने ऑनलाईन उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य भारद्वाज म्हणाले,२१ व्या शतकातील आव्हानाचा सामना करण्यासाठी भारतातील विद्यार्थ्यांना कला, कौशल्याआधारीत शिक्षण देण्याच्या उद्देशाने गुणवत्तापूर्ण आणि मूल्याआधारीत शिक्षण देणे, विद्यार्थ्यांच्या आधुनिक युगातील शैक्षणिक गरजाची पूर्ती करणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य उज्वल करणे, त्यांचे जीवन संस्कारशील बनवणे. विद्यार्थ्यांना सर्वोत्तम नागरिक घडविणे ह्या ध्येय आणि धोरणाची परिपूर्ती करण्यासाठी शाळा सतत प्रयत्न करत आहे.

कोरोना विषाणूच्या महामारीमुळे जगातील सर्व शैक्षणिक संस्था बंद असतांना देखील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून पोदार शाळेने हिंगोली शहरात प्रथमच व्हर्चुयल क्लासद्वारे ज्ञानदानाचे कार्य अविरतपणे व पूर्ण क्षमतेने सुरू ठेवले. शाळेच्या अविरत व सूक्ष्म नियोजनामुळे विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचा देखील उत्तुंग प्रतिसाद मिळाला असल्याचे सांगून,

पोदार शाळेने कोरोना काळापासूनच ऑनलाईन क्लास सुरु करून विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य अविरत सुरु ठेवले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाला चालना मिळाली. ऑनलाईन क्लासमध्ये शिक्षक सर्वोत्तम पद्धतीने शिकवत असल्यामुळे विद्यार्थ्यांना सहजपणे लक्षात राहते असे त्यांनी सांगितले.

शाळा प्रशासन, पालक व शिक्षकांच्या अविरत प्रयत्नचे फळ म्हणजे हिंगोली शहरातील शाळेची भव्यदिव्य अशी वास्तु या शाळेतून नक्कीच सर्व गुणसंपन्न विद्यार्थी घडतील. ऑनलाइन क्लास सुरू करून लहान मुलांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण केली . पोदार शाळेने लहान मुलांना ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून मोठ्या आनंदाने शाळेसोबत जोडले. शाळेत घेण्यात आलेल्या विविध ऑनलाइन कार्यक्रम व उपक्रमास विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांनी देखील नेहमीच मोठा प्रतिसाद दिला. त्याबद्दल शाळेने विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचे मनापासून आभार मानले.

-----------------

कोरोनामुळे सर्व शाळा बंद होत्या मुलांच्या शैक्षणिक भविष्याचे कसे होणार या चिंतेत असतानाच पोदार शाळेने ऑनलाईन क्लास सुरु करून



विद्यार्थ्यांना शिकवायला सुरु केले. त्यामुळे मुलांनासह आम्हाला आनंद झाला.पोदार शाळेतील शिक्षक अतिशय उत्तम पद्धतीने शिकवतात त्यामुळे मुलांना सर्व संकल्पना समजतात . शिक्षणा बरोबरच शाळेने विविध उपक्रम सुरु केल्यामुळे मुलांनी अधिक आवडीने क्लास केले. शाळेने मुलांनासोबतच पालकांसाठी विविध उपक्रम सुरु केल्यामुळे पालकही लॉकडाऊनच्या काळात शाळेच्या उपक्रमात मोठ्या आनंदाने सहभागी झाले . शाळेचे प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज यांच्यासह शिक्षकांनी ऑनलाईन शिक्षण पद्धतीमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. आणि आज मुलांच्या वार्षिक परीक्षेचा गुणवत्तापूर्ण निकाल पाहून मुलांनासह आम्हालाही मोठा आनंद झाला.

दीपाली जोशी (पालक)

ती नलिनी अशोकराव देशपांडे यांचेकरीता मॅजिक पब्लीकेशन, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर, जि. लातूर येथे छापून दै. मराठवाडा केसरी कार्यालय, हवालदार भवन, शिवाजी नगर, हिंगोली, जि. हिंगोली (महा) येथे प्रकाशित केले. संपादक : नरसिंह पांडूरंग घोणे



# media coverage

2021-22

PODAR INTERNATIONAL SCHOOL
MORE THAN GRADES
Since 1927

लोकमत

# ‘पोदार’मध्ये वर्तमानपत्र वाचन उपक्रम सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**हिंगोली** : येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच वर्तमानपत्र वाचन उपक्रम सुरु केला आहे. या उपक्रमामध्ये शाळेतील विद्यार्थी आपल्या आवडीचे वर्तमानपत्र वाचतात आणि आपल्या ऑनलाईन क्लासमध्ये आपण वाचन केलेल्या बातम्या सांगत आहेत.

प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज विद्यार्थ्यांना बोलताना म्हणाले की, वर्तमानपत्र समाज मनाचा आरसा असतो. जगातील राजकीय, सामाजिक शैक्षणिक सह आर्थिक घडामोडीची माहिती वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होते. तसेच स्थानिक घडामोडीही प्रसिद्ध होतात, त्यामुळे ज्ञानात भर पडते. म्हणूनच विद्यार्थ्यांनी नियमितपणे वर्तमानपत्र वाचले पाहिजे. हा वाचन उपक्रम सुरु केल्यामुळे विद्यार्थ्यांना वर्तमानपत्र वाचन करण्यासाठी आवड निर्माण होत आहे.

“ आम्ही नियमितपणे लोकमत वर्तमानपत्राचे वाचन करत असतो. वर्तमानपत्रामधील माहितीमुळे आमच्या ज्ञानात भर पडत असल्याचे सांगितले. तसेच लोकमतच्या माहितीपूर्ण आणि आकर्षक छपाईमुळे वाचण्याची आवड निर्माण होत आहे.



Hello Hingoli
Page No. 3 Apr 07, 2021
Powered by: erelego.com

# पोदार मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन




**हिंगोली/प्रतिनिधी** : येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ऑनलाईन पद्धतीने बुधवारी साजरी करण्यात आली. शाळेतील शिक्षक अमोल शेष यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्ययावर आपल्या भाषणातून प्रकाश टाकला.

शिक्षिका प्रणाली दाभाडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रंथप्रेम या विषयावर मार्गदर्शन केले. शाळेतील वरिष्ठ समन्वयक मुकुंदराज हुंबे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचार या विषयावर आपल्या मनोगतातून प्रकाश टाकला.

तसेच शिक्षक किरण जोगी यांनी सामाजिक एकतेचा संदेश देणारे भिमगीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवेंद्र खरटमळ यांनी केले तर आभार फौजिया यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक समन्वयक संतोष दिपके आणि शाळेतील सर्व शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

# उत्तम प्रशासक आणि आदर्श गुरु, प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज

वाढदिवस विशेष

आपल्या कर्तृत्वाला मानाचा मुजरा



बुडत्या सूर्याला पाहून अंधार झाला, रात्र झाली, आता भयान काळोख पसरणार अशा विचारांनी भयभीत न होता, रंगांची उधळण करीत सकाळी सूर्योदय होणार आहे. अंधार सरणार आहे. अवघी चराचर सृष्टी प्रकाशात न्हाऊन निघणार आहे. निराशेचा खेळ संपवून, आशेची पाखरे आकाशात झेपावणार आहेत. असा विचार करून होणाऱ्या सूर्यादयाची उस्फूर्तपणे वाट पाहणारे, उत्साही व्यक्तिमत्व म्हणजे पोद्दार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज होय.

एकूणच तुमच्या कार्याविषयी बोलायचे झाले तर तुमचं व्यक्तिमत्त्व मोरासारखं आहे. जसा मोर आपल्या पिसार्याच कौतुक स्वतः कधीच करत नाही, दुसरे त्याची योग्यता ओळखतात, कौतुक करतात, तसेच तुमच्या बाबतीत घडत आहे. कोणत्याही संघटनेच्या प्रमुख प्रशासकाच्या अंगी औदार्याची भावना म्हणजे मनाचा मोठेपणा असल्याशिवाय संघटना यशस्वी होऊ शकत नाही ही कुठलीही राजकीय, सामाजिक पार्श्वभूमी नसताना हिंगोली सारख्या शहरात तुम्ही पाच वर्षात शाळा नावारूपाला आणली. हे शक्य झाले, ते तुमच्यातील अनंत शक्ती, असीम उत्साह, पराकोटीचे साहस आणि संयम त्याचबरोबर सर्वांना सोबत घेऊन कार्य करण्याचे कौशल्य इतर सहकार्यातील गुणांचा शोध घेऊन त्यांना विकसित करून त्यांचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपयोग करून घेण्याचे कौशल्य तुमच्या मध्ये आहे. त्यामुळेच तुम्ही इतक्या कमी वेळेत शाळेची पाळे-मुळे हिंगोली सारख्या मागास भागात रुजवू शकलात म्हणूनच तुमच्या विषयी म्हणावेसे वाटते. आयुष्याच्या सुंदर किनारीला तलम विचारांची आवश्यकता असते अशी विचारधारा जपणारी माणसंच असे यशाचे शिखर गाठू शकतात. हे तुम्ही आणि तुमच्या सर्व शिक्षकवृंदानी सिद्ध करून दाखवले आहे.

कुशल संघटक

कोणत्याही संघटनेची रचना ही वरिष्ठ-कनिष्ठ स्तर अशा पद्धतीने करण्यात आलेली असते परंतु संघटना चालवत असताना सारासार विचार केला तर प्रत्येक पदावरील व्यक्ती व त्याचे कार्य महत्त्वाचे असते. कुणीही श्रेष्ठ आणि कुणीही कनिष्ठ नसतो. याबाबतची जाणं ज्या प्रशासकाला असते तो उत्तम प्रशासक ठरतो ही जाणीव केवळ माणुसकीची जपणूक करणाऱ्या व्यक्ती मध्येच दिसून येते .या संदर्भात स्वामी विवेकानंदांचे विचार अतिशय बोलके ठरतात. ते असे जागृतीचा नवा मूलमंत्र ज्यांच्या अंतकरणात सतत तेवत राहतो त्यालाच माणुसकीची जपनूक करणारा माणूस म्हणावे, हे विचार तुमच्या व्यक्तिमत्वाला लागू होतात. हा माणुसकीचा मूलमंत्र तुम्ही स्वतः पुरता मर्यादित न ठेवता तुमच्या टीम मधील प्रत्येक व्यक्तीत रुजवला आहे. जो माणूस दोन्हीबाजूचा विचार करू शकतो, तो शांत, स्थितप्रज्ञ राहू शकतो. ही 'स्थितप्रज्ञता' तुम्ही स्वतः बरोबर शाळेतील प्रत्येक व्यक्तीमध्ये रुजवल्याचे दिसून येते. सर्वांना तुम्ही म्हणजेच तुमच्या संघटनेतील सदस्य बरोबरच आम्हा पालकांना देखील एक अतिशय महत्त्वाची बाब शिकवली आहे. ती म्हणजे जिव्हाळ्याची माणसे मौल्यवान असतात. माणसं मिळवत मिळवत त्यांना बरोबर घेऊन जीवन प्रवास करायचा असतो. हे तुम्ही तुमच्या वर्तनातून दाखवून दिले आहे. त्याचबरोबर सुसंवाद ही कला आहे. त्यासाठी आपले मन, विचार, कृती, उच्चार, निरोगी असणे आवश्यक असते. हे कौशल्य देखील तुमच्या मनमोकळ्या स्वभावातून सिद्ध झाले आहे. कारण मन मोकळ्या स्वभावाची माणसेच उत्तम संवाद साधू शकतात. याचा प्रत्यय सर्व पालकांना वारंवार आला आहे. प्रशासन शिकवत असताना मी माझ्या विद्यार्थ्यांना आदर्श प्रमुख प्रशासक कसा असावा, हे सांगत असताना तुमचे उदाहरण देते.

सर्वोत्तम शिक्षक

प्रमुख प्रशासकाच्या अगोदर तुम्ही एक शिक्षक आहात. एक शिक्षक म्हणून देखील तुमची भूमिका अतिशय उत्कृष्ट ठरली आहे. तुमचे आणि तुमच्या सर्व शिक्षकांचे मोठेपण तुमच्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या नजरेत ओतप्रोत भरलेले दिसून येते. आपल्या शिक्षकांसाठी सर्वात मोठा पुरस्कार म्हणजे विद्यार्थ्यांच्या ह्रदयातील आपली आदर्श प्रतिमा हा असतो. त्याची किंमत पैशात होऊ शकत नाही, तो पुरस्कार पाच वर्षात तुम्ही व तुमच्या टीममधील सर्व शिक्षकांनी मिळवला आहे. यातून हेच लक्षात येते, की शिक्षकांचा मोठेपणा त्याला मिळणाऱ्या पैशांमध्ये नसून त्याची विद्वत्ता, शुद्ध चारित्र्य, निपक्षपाती स्वभाव व त्यांच्या बोधन शक्तीत असतो. खरंच सर आपण फार भाग्यवान आहोत. आपण शिक्षक आहोत गुरु ही पदवी आपल्याला लाभलेली आहे. गुरू या शब्दाचा अर्थ फार व्यापक आहे. हे मी तुम्हाला सांगणे योग्य नाही कारण मी एक पालक म्हणून तुमच्या विषयी लिहित आहे, पण तुम्ही तो गुरु चा अर्थ सार्थ करून दाखवला आहे. तो असा गुरुंच्या अंगी व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंनी भरलेला सागरच हवा म्हणजेच विचारांचे ऐश्वर्य, वाणीचे माधुर्य, व वृत्तीचे गांभीर्य ,मनाचे औदार्य, व्यवहाराचे चातुर्य इत्यादी गुणांनी युक्त असणारा गुरु विद्यार्थ्यांना आदर्श वाटतो. तो आदर्श तुम्ही व तुमच्यातील सर्व शिक्षकांनी मुलांसमोर ठेवला आहे.

आदर्श गुरु

सर मी एक पालक म्हणून माझ्या मुलाच्या संदर्भात अतिशय समाधानी आहे. तुम्ही माझ्या दोन्ही मुलांना वेदांत आणि राजवर्धन यांना पुस्तकी ज्ञानात तर उत्कृष्ट बनवले आहे, परंतु त्यांच्या सुप्त गुणांचा शोध घेऊन वेळोवेळी विविध कार्यक्रमात सहभागी करून घेऊन त्यांच्या कौशल्याचा देखील विकास केला आहे. भविष्यात ते कोणत्या पदावर जातील हे मी आज सांगू शकत नाही. परंतु एक उत्कृष्ट माणूस म्हणून समाजात ते आपले स्थान नक्कीच निर्माण करतील. असा केवळ विश्वासच नाही, तर मला आत्मविश्वास आहे. याचे सर्व श्रेय मी व माझे पती आदरणीय प्रभाकर माने पोद्दार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य व अगदी पहिलीपासून दहावीपर्यंत ज्या शिक्षकांनी माझ्या मुलावर स्वतःचे मूल समजून संस्कार केले, मूल्य संस्काराचे धडे दिले त्यांना असेल, कारण सर तुम्ही सर्वांनी खूप मेहनत घेऊन हे कार्य केले आहे. मानवी जीवनात अंत:करणातून आपले हीत फक्त तीनच व्यक्तीला निस्वार्थ भावनेतून पाहत असतात. त्यामध्ये आई वडील आणि शिक्षक तुमचे सर्वांचे कार्य पाहून मला हा क्रम बदलावा वाटतो, प्रथम शिक्षक आणि द्वितीय स्थानावर आई-वडील हे सार्थक ठरेल. कारण घरातील आई फक्त एक किंवा दोन स्वतःच्या मुलांना घडवते.

मला व माझ्या मिस्टरांना, आयुष्यात अगदी पहिलीपासून ते शेवटपर्यंत गुरु अतिशय उत्कृष्ट भेटले म्हणूनच आज आमचं आयुष्य सुखकर झाले. आजही त्यांच्याशी आमचे रिलेशन पक्के आहेत. माझ्या मुलांना देखील खूप चांगले गुरु लाभले आयुष्याच्या प्रत्येक वळणावर त्यांना तुमचा आशीर्वाद लाभावा एवढीच जाता-जाता प्राचार्य भारद्वाज सर व सर्व शिक्षकवृंदना प्रार्थना करते. गुरु संदर्भात दोन वेळी व्यक्त करते.

काय असतो गुरु
लिहावा तर ग्रंथ आहे गुरु
वाचावा तर नशीब आहे गुरु
ज्याचा स्पर्श जाणवतो तो वारा आहे गुरु अंबरातील अफाट आकाशगंगा आहे गुरु, सागरमाथ्याची उंची म्हणजे गुरु ,सूर्याचे पहिले किरण आहे गुरु,
लखलखीत चांदणं आहे गुरु
केली तर जादू आहे गुरु
गायली तर गझल आहे गुरु
विचार केला तर हवहवसं
वाटणारं स्वप्न देखील आहे गुरु

परमेश्वराने दिलेले एक वरदान आहे गुरुशेवटी तुमच्या सर्व टीम साठी एवढेच म्हणेल उल्हासित मने, प्रेरणादायी प्रत्येक कृती अपार कष्ट आणि प्रगाढ आत्मविश्वास याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे पोद्दार इंटरनॅशनल स्कूल मधील प्रत्येक पदावरील व्यक्ती.

प्रा. डॉ. माने सुरेखा प्रभाकर
(लोकप्रशासन विभाग प्रमुख)
कै.डॉ. शंकरराव सातव कला व वाणिज्य महाविद्यालय, कळमनुरी.

# उत्सव फुला.. फुलांचा, हृदया.. हृदयात ठेवा

आई –बाबा, शिक्षकांचा मान ठेवा अन आदर्श त्यांचा घ्यावा
एकाग्रतेने अभ्यास करा अन सुंदर व्यक्तिमत्व ठेवा.

नव्या सृजनशील कल्पना, नवे एकनिष्ठ ध्येय ठेवा.
नवी चैतन्यमय उमेद अन नवे संकल्प हाती ठेवा.

आपल्या हृदया.– हृदयात, सद्गुणी विचार ठेवा.
उत्सव फुला.. फुलांचा, मनाच्या गाभाऱ्यात ठेवा....

आपल्या काळजा.– काळजात, उच्च स्वप्न ठेवा.
यशाचे शिखर गाठावेच लागेल, संयम मनात ठेवा...

यश तर मिळणारच आहे, प्रयत्न हातात ठेवा.
दुसऱ्यांचे का ऐकावे, स्वतःला तपासून ठेवा...

मतभेद नकोच आता, हातात एकीचे बळ ठेवा.
दुसर्यांवर का जळावे, स्वतःचे वर्तन शुद्ध ठेवा...

कार्य सृजनशील हवे, सर्वोत्कृष्टतेची वृत्ती ठेवा.
एकमेकांस सहाय्य असावे, आपुलकीची मैत्री ठेवा...

अपयश येती हाती, जिंकण्याची सदैव जिद्द ठेवा.
चुकीला माफी मिळावी, क्षमाशिलतेची कास ठेवा...

गर्वाने का राहावे, गर्वाचे घडे फोडून ठेवा.
उत्सव फुला.. फुलांचा, हृदया.. हृदयात ठेवा....

नकारात्मक नकोच आता, सकारात्मक विचार ठेवा.
पाहण्याची दृष्टी बदला, दृष्टीत वसंत फुलता ठेवा .

चंद्रकांत नांगरे
ग्रंथपाल
पोदार इंटरनॅशनल स्कूल, हिंगोली

सकाळ

# विद्यार्थ्यांसाठी पुस्तके म्हणजे जीवनातील खरे मित्र

## प्राचार्य भारद्वाज; पोदार शाळेत जागतिक ग्रंथ दिन

**हिंगोली, ता. २३ (बातमीदार) :** ''विद्यार्थ्यांसाठी पुस्तके म्हणजे जीवनातील खरे मित्र होत. पुस्तके आपले मित्र, मार्गदर्शक आणि खरे गुरु असतात, असे प्रतिपादन प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांनी जागतिक ग्रंथ दिनानिमित्त शुक्रवारी (ता. २३) केले.



येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये ऑनलाइन पद्धतीने जागतिक ग्रंथ दिवस साजरा करण्यात आला. त्यावेळी प्राचार्य भारद्वाज बोलत होते. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अधिकाधिक पुस्तकांचे वाचन करावे. पुस्तके वाचनाने आपल्याला नवे मार्ग दिसतात. नवे विचार, नव्या कल्पना मिळतात. विद्यार्थ्यांसाठी पुस्तके म्हणजे जीवनातील खरे मित्र होत. पुस्तके आपले मित्र, मार्गदर्शक आणि खरे गुरु असतात.

शाळेतील ऑनलाइन क्लासमध्ये 'एक दिवस, एक कवी' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये कवी कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर, नारायण सुर्वे आणि रवींद्रनाथ टागोर यांच्यासारख्या महान कवींच्या कवितांचे वाचन करण्यात आले. त्याला विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला.

ऑनलाइन क्लासमधील 'आपले मित्र - आपले पुस्तक' या उपक्रमामध्ये विद्यार्थी आपल्याजवळ असलेल्या पुस्तकांचे वाचन करून त्यामधील माहिती सांगत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तक वाचनाची गोडी लागत आहे. शाळेतील ग्रंथपाल चंद्रकांत नांगरे यांनी विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन डिजीटल लायब्ररी तयार केली असून त्यामध्ये विविध विषयावरील पुस्तके ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध आहेत. त्याचा विद्यार्थी लाभ घेत आहेत.

Nanded, Hingoli-Today1
24/04/2021 Page No. 3





# विद्यार्थ्यांसाठी पुस्तके म्हणजे जीवनातील खरे मित्र होत : प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज

**हिंगोली/प्रतिनिधी** : विद्यार्थ्यांसाठी पुस्तके म्हणजे जीवनातील खरे मित्र होत. पुस्तके आपले मित्र, मार्गदर्शक आणि खरे गुरु असतात. असे प्रतिपादन प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांनी जागतिक ग्रंथ दिवस साजरा करतांना केले.



येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये शुक्रवारी ऑनलाईन पद्धतीने जागतिक ग्रंथ दिवस साजरा करण्यात आला. यावेळी बोलतांना प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अधिक पुस्तकांचे वाचन करावे. पुस्तके वाचनाने आपल्याला नवे मार्ग दिसतात. नवे विचार मिळतात आणि नव्या कल्पना मिळतात. विद्यार्थ्यांसाठी पुस्तके म्हणजे जीवनातील खरे मित्र होत. पुस्तके आपले मित्र, मार्गदर्शक आणि खरे गुरु असतात.

शाळेतील ऑनलाईन क्लासमध्ये 'एक दिवस एक कवी ' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये कवी कुसुमाग्रज, मंगेश पाडगांवकर, नारायण सुर्वे आणि रवींद्रनाथ टागोर यासारख्या महान कवींच्या कवितांचे वाचन करण्यात आले. त्याला विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला, त्यापासून प्रेरणा घेऊन शाळेतील विद्यार्थी देखील कविता लेखन करू लागले आहेत.

तसेच ऑनलाईन क्लासमधील आपले मित्र- आपले पुस्तक या उपक्रमामध्ये विद्यार्थी आपल्या जवळ असलेल्या पुस्तकांचे वाचन करून त्यामधील माहिती सांगत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तक वाचनाची गोडी लागत आहे.

शाळेतील ग्रंथपाल चंद्रकांत नांगरे यांनी विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन डिजिटल लायब्ररी तयार केली असून, त्यामध्ये विविध विषयावरील पुस्तके ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध आहेत. त्याचा विद्यार्थी मोठ्या प्रमाणात लाभ घेत आहेत. प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांनी पुस्तक वाचन उपक्रमाचे कौतुक करून विद्यार्थ्यांना नियमितपणे पुस्तक वाचन करावे असे सांगितले.

गोदातीर समाचार

पान २

# ग्रंथालय : राष्ट्र विकासातील समृद्ध वाटचाल



मानवाच्या विकास यावेविषयी नोबेल पुरस्कार विजेते जोसेफ स्टिगलीट्झ यांचे क्रिएटिंग ए लर्निंग सोसायटी हे पुस्तक प्रकाशित झाले त्या त्यांनी म्हटले की कोणत्याही देशाचा विकास हा त्यामध्ये मांडवली गुंतवणूक किती प्रमाणात होते यावर अवलंबून नसून त्या देशातील लोकांची, समाजाची शिकण्याची आणि ज्ञान घेण्याची किती जिज्ञासा आहे, क्षमता आहे आणि ती कशी आहे यावर अवलंबून असतो. तंत्रज्ञान, शोध आणि माहिती आधारित अर्थव्यवस्था निर्माण होत असून त्यामध्ये ग्रंथालय महत्वपूर्ण भूमिका घेऊन राष्ट्र विकासाची समृद्ध वाटचाल तयार करू शकते. भारत हे वाचनसंस्कृती आणि साहित्यपरंपरा लाभलेलं राष्ट्र आहे. राष्ट्र विकासातील समृद्ध वाटचालीत ग्रंथालय महत्वपूर्ण सहयोग देत आहेत. राष्ट्राच्या शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक व वैज्ञानिक अशा सर्वच क्षेत्रात ग्रंथालय समृद्ध होत आहेत. ग्रंथालयाचे राष्ट्र विकासातील महत्व सिद्ध करून लोकांना ग्रंथालयाकडे आदर्श, सृजनात्मक, सुसंस्कृत समाजाचा आधारस्तंभ म्हणून पाहायला लावणे आवश्यक आहे.

ग्रंथालयातील अत्यावश्यक, नवीन आणि उपयुक्त विषयावर संशोधन करून त्याचे राष्ट्र विकासाच्या समृद्ध वाटचालीतील महत्व सांगून ग्रंथालयाचा राष्ट्र विकासातील सहभाग वाढवणे हे आजच्या काळाची गरज आहे. राष्ट्रीय ग्रंथालय, सार्वजनिक ग्रंथालय, विशेष ग्रंथालय, शैक्षणिक ग्रंथालय, संशोधन ग्रंथालय, डिजिटल ग्रंथालय आणि ग्रंथालयीन माहिती केंद्र अशा विविध प्रकारचे ग्रंथालय आपल्या ग्रंथालयीन सेवा देऊन राष्ट्र विकासाला सहकार्य करतात. हे लक्षात घेऊन भारत शासनाने माहिती राष्ट्रीय धोरण स्वीकारले आणि राष्ट्रीय ज्ञान आयोग स्थापन केला.

आजची अर्थव्यवस्था ज्ञानाधिष्ठीत होत आहे . आज राष्ट्राची सर्व शासकीय व्यवस्था ही ज्ञान केंद्रीत होत आहे. माहिती आणि तंत्रज्ञानात अग्रेसर राष्ट्र आज विकसित होत आहेत. त्यामुळे आपल्याला ज्ञान निर्मितीची, संकलन आणि प्रसारांची केंद्रे असलेली ग्रंथालय समृद्ध करून राष्ट्र विकासाला चालना द्यावी लागेल. तरच एक सुसंकृत , सुजाण , सर्जनशील , स्नेहमय राष्ट्र विकसीत होईल.

**राष्ट्रीय ग्रंथालय : राष्ट्र विकासात योगदान**

प्रत्येक राष्ट्राची एक स्वतः ची संस्कृती आणि इतिहास असतो. त्याचे संवर्धन , जतन आणि प्रसारण करण्यासाठी राष्ट्रीय ग्रंथालय स्थापन केली जातात. देशाच्या ग्रंथालय पध्दतील राष्ट्रीय पातळीवर असणारी ग्रंथालय म्हणजे राष्ट्रीय ग्रंथालय होय. . राष्ट्रातील वाचन साहित्याचे कायदेशीर जतन करण्याचे उद्दिष्ट असल्याने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ग्रंथसूची तयार करणे सहज शक्य होते . देशाची प्रतिमा आणि प्रतिष्ठा ज्यातून व्यक्त होते असे सर्व वाचन साहित्य संग्रहित करणे हे राष्ट्रीय ग्रंथालयाचे प्रमुख कार्य आहे .

राष्ट्रातील सर्व क्षेत्रातील ग्रंथालयांना मार्गदर्शन करणे. राष्ट्रात प्रकाशित होणारी ग्रंथ आणि ग्रंथेतर साहित्य संग्रहीत, जतन आणि प्रसारित करणे. शासनाला ग्रंथ सेवा देणे, देश विषयी प्रकाशित साहित्य संग्रहित करणे . देशाविषयी आवश्यक परदेशी साहित्याचे संवर्धन करणे तसेच वाचन साहित्य, ग्रंथकोशाविषयी आणि दस्तऐवज आणि सेवा याविषयी रेफरल केंद्र म्हणूनही कार्य करून राष्ट्रीय ग्रंथालय राष्ट्र विकासात योगदान देते.

**सार्वजनिक ग्रंथालय : राष्ट्र विकासाचा आधारस्तंभ**

राष्ट्र विकासाच्या वाटचालीत सार्वजनिक ग्रंथालय महत्वाचा आधारस्तंभ म्हणून कार्य करतात. लोकांचे, लोकांसाठी लोकांनी चालवलेले ग्रंथालय म्हणजे सार्वजनिक ग्रंथालय होय. सार्वजनिक ग्रंथालय हे लोकांचे विश्वविद्यापीठ आहे. लोकांच्या सहकार्यातून चालवली जाणारी लोकसंस्था आहे. ही ग्रंथालय ज्ञान व माहितीचे आगर आहेत. राष्ट्रातील एक सांस्कृतिक केंद्र म्हणून ही ग्रंथालये सेवा देतात.

भारतात जवळ-जवळ ६ लाख २५ हजार गांव आहेत. त्या सर्व गावात सार्वजनिक ग्रंथालय स्थापन केल्यास ६ लाख २५ हजार सार्वजनिक ग्रंथालय निर्माण होतील आणि त्यामध्येमातून आपण शासनाच्या विविध योजना, बाजारपेठेची माहिती, शिक्षण प्रसार, सामाजिक आणि आर्थिक विकास करता येईल. तसेच ग्रामीण विकास संबंधित जागृती कार्यक्रम, मानवाधिकार व सामाजिक विकास संबंधित कार्यक्रम, युवक, महिला आणि बाल विकास संबंधित कार्यक्रम, आरोग्य संबंधित कार्यक्रम, पर्यावरण पर्यावरणशास्त्र आणि जैव विविधता विकास कार्यक्रम, विज्ञान आणि तंत्रज्ञान विकास कार्यक्रम, कला आणि संस्कृती संबंधित कार्यक्रम इ. विकास संबंधित कार्यक्रम ग्रंथालयाच्या माध्यमातून घेऊन राष्ट्र विकास केला जातो.

**शैक्षणिक ग्रंथालय : राष्ट्राच्या शैक्षणिक विकासाचा मानदंड**

शैक्षणिक संस्थेशी संबंधीत ग्रंथालय म्हणजे शैक्षणिक ग्रंथालय होय. विद्यार्थ्यांना भावी जीवनात मानाचे आणि योग्य स्थान मिळावे म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा, विद्यार्थी मध्ये असलेली वाढ; नवीन आणि कलात्मक गुणांची वाढ करण्याच्या उद्देशाने शैक्षणिक ग्रंथालय स्थापन केली जातात. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक, तांत्रिक, नैतिक समृद्धी एक शांत सामाजिक चळवळ म्हणून दिशा देणे, एक कृतीशिल भूमिका बजावणे आणि वाढणे किंवा समृद्ध राष्ट्र निर्माण करण्यासाठी पुढाकार घेऊन कार्य करणे हे शैक्षणिक ग्रंथालयाच्या माध्यमातून सहज होऊ शकते.

शिक्षण मानवी आणि आर्थिक विकासाची एक महत्वाची गुंतवणूक आहे. महाविद्यालये, विद्यापीठे, प्रयोगशाळा, कौशल्य विकास केंद्रे, स्पर्धापरीक्षा तयारी केंद्रे, योग आणि आध्यात्मिक केंद्रे, क्रीडा प्रशिक्षण केंद्रे, व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण केंद्रे संशोधन आणि इतर संस्था मध्ये ग्रंथालय स्थापन करून शिक्षण आणि ज्ञान करून विकास आणि प्रगती करणे शक्य होईल.

पाठ्यपुस्तके सर्वाधिक प्रमाणात आपल्या राष्ट्रीय संस्कृती प्रतिनिधित्व करणारे शैक्षणिक साधन म्हणून वापरले जाते. पाठ्यपुस्तकातून आपले राष्ट्र, राष्ट्रीय मूल्ये, संस्कृती, विचारधारा आणि जीवन प्रणाली यांचे दर्शन घडते. राष्ट्रीय संस्कृती, सामाजिक मूल्य आणि राष्ट्रीय एकात्मता वाढवण्यासाठी प्रभावी माध्यम आहे.

**संशोधन ग्रंथालय : संशोधन विकासाच्या कार्याचा दीपस्तंभ**

संशोधन संस्थेमध्ये असणारे ग्रंथालय म्हणजे संशोधन ग्रंथालय होय. ज्ञानाच्या सर्व शाखांम ध्ये संशोधन आणि विकास होत असतो. त्यामुळे विज्ञान ,अर्थशास्त्र व राज्यशास्त्र अशा क्षेत्रातील संशोधनासाठी स्वतंत्र संस्था आणि ग्रंथालय यांची आवश्यकता निर्माण झाल्याने त्या त्या क्षेत्रात संशोधन ग्रंथालय स्थापन होऊ लागली. संशोधन संस्थेमध्ये उच्च दर्जाचे संशोधन व्हावयास पाहिजे असेल तर सुसज्ज आणि समृद्ध ग्रंथलय हवे . ग्रंथालय वाचन साहित्या सोबतच संशोधनासाठी लागणाऱ्या अनेक सोयी- सुविधा पुरवते.

ग्रंथ , दुर्मिळ साहित्य, शासकीय प्रकाशने, संशोधन अहवाल व प्रबंध , पेटंट्स, मानके, ग्रन्थेतर संशोधन साहित्य, ताम्रपट, भुर्जपत्रे , हस्तलिखिते , चित्रे, छायाचित्रे, महितीपत्रे आणि संगणकीय साहित्य इ. वाचन साहित्य संशोधन ग्रंथालयात उपलब्ध असते. या वाचन साहित्यातून संशोधकास नवी माहिती आणि ज्ञान मिळून नव नवीन संशोधन निर्माण होतात.

विशेष ग्रंथालय: समृद्ध राष्ट्राची विशेष ओळख

माहिती युगात ज्ञान मोठ्या प्रमाणात निर्माण होत असल्याने त्या ज्ञानाचे संकलन , संग्रह आणि वितरण योग्य वेळी योग्य व्यक्तिला करण्यासाठी विशेष ग्रंथालयाची गरज निर्माण झाली. त्यातून विविध क्षेत्रात विशेष ग्रंथालय स्थापन होऊ लागले.

विशिष्ट ज्ञान क्षेत्रपुरती आणि विशिष्ट मर्यादितपुरती माहिती पुरवणारी ग्रंथालय म्हणजे विशेष ग्रंथालय होय. विशेष ग्रंथालय हे इतर ग्रंथालयांपेक्षा वेगळे असून त्यांच्या माहिती निर्मिती संग्रह, जतन आणि वितरण करण्याच्या सेवे नुसार ते विशेष ठरते.

**डिजिटल ग्रंथालय : राष्ट्र विकासातिल एक नवे क्षितिज**

तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आणि शिक्षण प्रसारामुळे माहिती मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहे. त्या माहितीचे आणि वाचन साहित्याचे संगणकीकरन करून माहिती डिजिटल रूपात केली जाते . डिजिटल ग्रंथालय म्हणजे माहिती आणि ज्ञानाच्या संघटित , विशाल संग्रहातून सुसंगत पध्दतीने माहिती शोध सुविधा पुरवणारी प्रणाली होय.

आजची ग्रंथालयाचे रूपांतर 'ग्लोबल नॉलेज सेंटर्स'मध्ये होत आहे. संगणकीकरण ही त्याची पहिली पायरी आहे.

आज अस्तित्वात असलेली बहुतेक सर्व ग्रंथालये संगणकीकरणाचा विचार करताना दिसत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी १० लाख ग्रंथ ऑनलाइन उपलब्ध करून दिले आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर अकॅडेमिक प्रेस, हायवायर प्रेस, ओसीएलसी आणि ऑक्सिड इ. संस्था डिजिटल माहिती सेवा पुरवतात. डिजिटल ग्रंथालय आपल्या वाखिन्यपूर्ण आणि ऑनलाइन सेवा देऊन राष्ट्र विकासाच्या वाटचालीत महत्वाची भूमिका करतात.

**भारतीय माहिती धोरण : राष्ट्र विकासाचे नियोजन**

ज्ञान युगात आपले राष्ट्र ज्ञानवंचित राहून प्रगती करू शकणार नाही. त्यासाठी ज्ञान निर्मिती आणि ज्ञान संग्रह करून ज्ञानमय राष्ट्र करणे आवश्यक आहे याची शासनाला जाणीव झाल्यामुळे शासनाने माहितीचे नवे धोरण स्वीकारले. ज्ञानी नागरिक ही राष्ट्राची संपत्ती असून महितीचा योग्य विनियोग नागरिकांच्या विकासासाठी करणे अत्यावश्यक आहे. मानवी संस्कृतीचा ठेवा लोकांसमोर प्रदर्शित करणे. अशा माहितीच्या राष्ट्रीय धोरणातून राष्ट्र विकासाचे नियोजन करता येते.

भारतात राष्ट्रीय माहिती प्रणाली मध्ये निसाट, इन्सडाक, डेसिडाक आहेत. तर आंतर राष्ट्रीय प्रणाली मध्ये यूनिसिस्ट, इनीस, अग्रीस आणि मेडलर्स इ. माहिती प्रणाली आहेत. भारतीय माहिती धोरणातून राष्ट्र विकासाचे नियोजन करून राष्ट्र विकास साध्य करता येईल.

**डिजिटल भारत : ज्ञानाधिष्ठीत सामाजिक आणि अर्थीक क्रांतीची नवी सुरुवात**

डिजिटल भारत करण्यासाठी प्रधानमंत्री श्री नरेन्द्र मोदी यांनी मंजूरी दिली असून त्यासाठी डिजिटल सशक्त समाज आणि ज्ञान अर्थव्यवस्था मध्ये भारताला बदलने : एक कार्यक्रम हा उपक्रम सुरू केला आहे.

डिजिटल सशक्त समाज आणि ज्ञान अर्थव्यवस्था मध्ये भारताला बदलने हे या उपक्रमाचे उद्देश आहे. २०१८ पर्यंत डिजिटल भारत निर्माण करणे हे ध्येय आहे. त्यासाठी परिवर्तनकारी इलेक्ट्रॉनिक सेवा नागरिकांना देणे हे या उपक्रमाचे कार्य आहे.

प्रत्येक नागरिकाला उपयुक्त ई-सेवा देणे, ग्रामपंचायती मध्ये उच्च गतिचे इंटरनेट सेवा उपलब्ध करून देणे, एक सार्वजनिक क्लाउड तयार करने आणि साइबर-स्पेस सुरक्षित सुरक्षित करणे इ. उद्देशाने हा उपक्रम सुरू केला आहे . ऑनलाइन आणि मोबाइल द्वारे सरकारी सेवा उपलब्ध करून देणे, सरकार सेवा डिजिटल करणे, युनिव्हर्सल डिजिटल साक्षरता करणे, डिजिटल संसाधने सर्वत्र सुलभ उपलब्ध करून देणे, सर्व सरकारी दस्तावेज / प्रमाण पत्र डिजिटल उपलब्ध करून देणे. असे कार्य ग्रंथालयांच्या माध्यमातून करता येऊ शकतात.

गांव तिथे ग्रंथालय ही मोहीम राबवून ज्ञानमय राष्ट्र निर्माण करता येऊ शकते. ज्ञानाधिष्ठीत सामाजिक आणि आर्थीक क्रांतीची नवी सुरुवात करून राष्ट्राला विकसित करता येऊ शकते.

**-चंद्रकांत गौतम नांगरे**
ग्रंथपाल
पोदार इंटरनॅशनल स्कूल,
हिंगोली

आपलं मन

विविध विषय

शुक्रवार दि. २३ एप्रिल २०२१

३


# ग्रंथालय : राष्ट्र विकासातील समृद्ध वाटचाल



सकाळ

# पोदारमध्ये जागतिक पृथ्वी दिवस

**हिंगोली, ता. २६ (बातमीदार)** : येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलने निसर्गासाठी वेळ उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमात विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सहभाग घेत आहेत. निसर्ग संरक्षण आणि संवर्धनासह पशू पक्षास चारा पाणी देत आहेत.

पोदार शाळेतील ऑनलाईन क्लासमध्ये विविध उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांना नवीन सृजनात्मक कार्य करण्यास प्रेरणा देतात. त्यातीलच निसर्गासाठी वेळ हा एक उपक्रम आहे. पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन यासह प्राणीमात्रावर प्रेम करावे, वृक्ष लागवड, वृक्ष जतन अशा संस्कारक्षम मूल्यांची रुजवण विद्यार्थ्यांमध्ये व्हावी, या हेतूने या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. निसर्गासाठी वेळ या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी आपल्या घरी रोपवाटिका तयार करत आहेत. वृक्ष लागवड करत आहेत. वृक्षाला पाणी देत आहेत. वृक्ष संवर्धन आणि जतन करत आहेत. पशु पक्षाला चारा पाणी देत आहेत. असे विविध उपक्रम विद्यार्थी करत आहेत. शाळा पर्यावरणपूरक विविध उपक्रम राबवित आहे. रोप वाटिकेतील वृक्षाची लागवड विद्यार्थी स्वतः करतात. त्या वृक्षाच्या संरक्षण आणि संवर्धनाची जबाबदारी घेतात. तसेच पर्यावरणपूरक गणपती उत्सव, होळी, रंगोत्सव, पर्यावरणावर चित्रकला स्पर्धा, प्रश्न मंजूषा, कार्यशाळा अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाचे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचे प्रयत्न केले जातात. प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.





**हिंगोली : निसर्गासाठी वेळ उपक्रमात पोदारच्या विद्यार्थ्यांनी झाडांसह पशुपक्षांसाठी पाणी दिले.**

Nanded, Hingoli-Today1
27/04/2021 Page No. 3





परिस्थितीत बाधित रुग्णांना रमडसाव्हार

# पोदारमध्ये जागतिक पृथ्वी दिवस साजरा

**हिंगोली/प्रतिनिधी :** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलने 'निसर्गासाठी वेळ' उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमात विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सहभाग घेत आहेत. निसर्ग संरक्षण आणि संवर्धनासह पशू - पक्षास चारा पाणी देत आहेत.

आजच्या कोरोनामय विषाणूमुळे जगातील सर्व व्यवहार बंद होत आहेत. तसेच वर्षभरापासून शाळाही बंद आहेत. पण पोदार शाळेतील ऑनलाईन क्लासमध्ये विविध उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांना नवीन सृजनात्मक कार्य करण्यास प्रेरणा देतात. त्यातीलच निसर्गासाठी वेळ हा एक उपक्रम आहे. पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन यासह प्राणीमात्रावर प्रेम करावे , वृक्ष लागवड , वृक्ष जतन, अश्या संस्कारक्षम मूल्यांच्या रुजवण विद्यार्थ्यांमध्ये व्हावी ह्या हेतूने या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. निसर्गासाठी वेळ या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी आपल्या घरी रोपवाटिका तयार करत आहेत. वृक्ष लागवड करत आहेत. वृक्षाला पाणी देत आहेत. वृक्ष संवर्धन आणि जतन करत आहेत. पशु पक्षाला चारा -पाणी देत आहेत असे विविध उपक्रम विद्यार्थी करत आहेत.

शाळेतील पर्यावरणपूरक उपक्रम

शाळा पर्यावरणपूरक विविध उपक्रम राबवित आहे. त्यामध्ये विद्यार्थी आपल्या वाढदिवसा निमित शाळेला वृक्ष भेट देतात. त्या वृक्षरोपची रोपवाटिका तयार करण्यात आली आहे. रोपवाटीकेतील वृक्षाची लागवड विद्यार्थी स्वतः करतात .त्या वृक्षाच्या संरक्षण आणि संवर्धनाची जबाबदारी घेतात. तसेच पर्यावरणपूरक गणपती उत्सव, होळी , रंगोत्सव , पर्यावरणावर चित्रकला स्पर्धा, प्रश्न मंजूषा, कार्यशाळा अश्या विविध उपक्रमाच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाचे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचे प्रयत्न केले जातात.

प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज बोलतांना म्हणाले की, पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. निसर्गाकडून विद्यार्थ्यांनी असंख्य गोष्टी शिकून घ्याव्यात. निसर्ग आपल्याच आनंदात जगत असतो. तसेच निसर्ग सर्वांना निरामय आणि आनंदी जीवन प्रेरणा आणि ऊर्जा देत असतो. प्रत्येक विद्यार्थ्यांनी झाडे लावावीत त्या झाडाचे जतन करावे , पशू -पक्षाला चारापाणी द्यावे . प्राणीमात्रावर प्रेम करावे . नैसर्गिक विविधतेचे रक्षण करून पर्यावरणाचा समतोल राखण्याचे प्रयत्न करावेत असे त्यांनी सांगितले.

मेरी प्यारी वसुंधरा ,नाराज ना करेंगे तुम्हे ,पेड पौधे लगाकर ,संभालेंगे हम तुम्हे ,या आशयावरील वृक्षरोपन करण्याचा संदेश देणारी कविता शाळेतील विद्यार्थी आशुतोष तिडके यांनी लिहली आहे. उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षिका प्रयत्न करत आहेत.



ही मालिनी अशोकराव देशपांडे यांचेकरीता मॅजिक पब्लीकेशन, मक्या शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर, जि. लातूर येथे छापून दै. मराठवाडा केसरी कार्यालय, हवालदार भवन, शिवाजी नगर, हिंगोली, जि. हिंगोली (महा) येथे प्रकाशित केले. संपादक : नरसिंह पांडुरंग घोणे



# media coverage

**2021-22**

PODAR INTERNATIONAL SCHOOL
MORE THAN GRADES
Since 1927


दैनिक मराठवाडा केसरी

हिंगोली

Email : daily.marathwadakesri@gmail.com

मंगळवार 04.05.2021

04


## पोदार मध्ये सृजनात्मक ऍक्टिव्हिटीच्या माध्यमातून आनंददायी शिक्षण

**हिंगोली/प्रतिनिधी** : पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये सृजनात्मक ऍक्टिव्हिटीच्या माध्यमातून आनंददायी शिक्षण देण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यात येत असल्याचे प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज यांनी सांगितले.

ऑनलाईन क्लासच्या माध्यमातून सर्वोत्तम आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा पुरेपूर प्रयत्न प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज यांच्या मार्गदर्शनातून प्रत्येक शिक्षक करत आहे. कोरोना लॉकडाऊन काळात शाळा बंद असूनही व्हर्चुअल क्लासच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात आहे. नियम आणि संघर्षमय परिस्थिती मध्ये विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांच्या माध्यमातून शिक्षण देऊन जीवनात नवी दिशा, नवी प्रेरणा आणि नवी दृष्टी देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.



**फॅन्सी ड्रेस स्पर्धा**

पोदार शाळेत विद्यार्थ्यांना जगातील नवीन ड्रेस पद्धतीबद्दल माहिती व्हावी आणि लहान मुलांनाही विविध प्रकारचे नवीन ड्रेस घालायला आवडत. नवीन ड्रेस घातल्यामुळे अगदी आनंदी आणि उत्साही होतात. म्हणून त्यांच्यासाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील पहिलीच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये लहान मुलांनी आकर्षक आणि मनमोहक फॅन्सी ड्रेस परिधान केले होते.

**बालकविता आणि कथा वाचन**

पुस्तके विद्यार्थ्यांचे मित्र असतात.

पुस्तके वाचन केल्याने व्यक्तिमत्व विकास होते. विचार करण्याची शक्ती मिळते, नवनवीन माहिती, ज्ञान मिळते, समाजातील वालू घडामोडी समजते, संभाषण कौशल्य वाढते, अभ्यास करायला मदत होते. शाळेतील दुसरी आणि तिसरीच्या मुलांसाठी बालकविता आणि कथा वाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत लहान मुलांनी इसापनीती, बोधकथा, देशभक्ती, अकबरीच कथा, उपदेशकथा अशा विविध प्रकारच्या संदेशमय कथा आणि कवितांचे वाचन केले.

**हेल्दी फूड हेल्दी डायट**

हेल्दी फूड हेल्दी डायट या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी स्वतः हेल्दी फूड थाळी तयार केली होती. त्यामध्ये फ्रूट्स आणि हेल्दी अन्न पदार्थांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

कोरोना काळात हेल्दी फूड आणि हेल्दी डायट घेणे आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. हेल्दी फूडमुळे इम्युनिटी पॉवर वाढण्यास मदत होते.

स्वस्थ अन्न खाल्ल्यामुळे शरीर निरोगी राहते आणि मनही ताजे तवाने राहते. शरीर मजबूत राहते म्हणून हेल्दी फूड खावे असा संदेश या स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांना देण्यात आला.

**रोल प्ले : द ग्रेट इंडियन हिरो**

रोल प्ले : द ग्रेट इंडियन हिरो या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी भारतातील महान महापुरुषांच्या वेशभूषा धारण करून त्यांच्या जीवन कार्यातून आपल्या जीवनात प्रेरणा घेण्याचा संदेश दिला.

शाळेतील पाचवीच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मदर टेरेसा या सारख्या महान महापुरुषांच्या वेशभूषा धारण केल्या होत्या.

**कोरोना काळात घ्यावयाची काळजी**

भारत कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत आहे. त्यामुळे कोरोना पासून संरक्षण करणे आवश्यक झाले आहे. खोकताना किंवा शिंकताना तोंडावर रुमाल किंवा हात धरायलाच हवा.

जेवेकरून जंतुसंसर्ग टाळता येतो. खाण्या-पिण्यापूर्वी हात स्वच्छ धुणे गरजेचे आहे. साबण आणि पाण्याने २० सेकंद हात धुवायला हवेत.भरपूर पाणी पिणे अत्यंत गरजेचे आहे. एकतर उन्हाळा सुरू आहे. त्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता भासते. त्यामुळे पाणी भरपूर प्यावे.सार्वजनिक ठिकाणी अनावश्यक जाणं टाळा. प्रवास करायचाच असेल तर पुरेशी काळजी घ्या. शक्यतो घरातच राहण्यास प्राधान्य द्या. इतरांशी शारीरिक संपर्क येऊ नये .घराबाहेर पडताना नाक, तोंड झाकणारा सेफ्टी मास्क वापर करावा.

सर्दी, ताप, खोकला, अंगदुखी असल्यास डॉक्टरच्या सल्ल्याने औषधे घ्यावीत. अशी काळजी घ्यावी यावर सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

**चित्रकला - अष्टपैलू व्यक्तिमत्व घडविण्याचे माध्यम**

चित्रकला या विषय मुळे अष्टपैलू व्यक्तिमत्व घडतेच सोबतच आपला सर्वांगीण विकासही घडतो. असा एकही विषय नाही कि ज्याला चित्र काढायची गरज नाही. चित्रकला या विषय मुळे आपल्याला अभ्यासात आलेला कंटाळा, नैराश्य दूर होते, अभ्यात एकाग्रता वाढते, एकाच जागी भरपूर वेळ बसून कार्य करण्याची क्षमता वाढते येवढेच नाही तर चित्रकला या विषयामुळे स्मरण शक्ती व कल्पना शक्ती यांचा देखील विकास होतो तसेच चित्रकला विषयामुळे हस्ताक्षरही सुंदर होते. याचा परिणाम मनावर होतो त्यामुळे मन आनंदित राहते. चित्रकला स्पर्धेच्या विविध ऍक्टिव्हिटी विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आल्या होत्या. तसेच निसर्ग संरक्षण आणि संवर्धन, विविध फनी ऍक्टिव्हिटी, शैक्षणिक प्रकल्प आणि उपक्रम या सारखे विविध उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक प्रयत्नशील असतात.



# media coverage

**2021-22**

PODAR INTERNATIONAL SCHOOL
MORE THAN GRADES
Since 1927

हिंगोली
Email : daily.marathwadakesri@gmail.com
गुरूवार
06.05.2021
04

## पोदार शाळेमध्ये विद्यार्थ्यांना ऑनलाइन योगासनाचे धडे

**हिंगोली/प्रतिनिधी** : योगासने केल्याने मन, शरीर आणि श्र्वास यांचे एकमेकांशी संतुलन राखले जाते आणि त्यामुळे आपल्या जीवनातील दिवसाचा प्रवास उत्साही, शांत, आनंदी आणि सर्वार्थाने सफल होण्यास मदत होते. असे प्रतिपादन शाळेचे प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांनी योगासनाच्या ऑनलाईन क्लासबद्दल बोलतांना केले.

येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये वर्षभरापासूनच ऑनलाईन शिकवणी वर्ग सुरु आहेत .पण आता मुलांना उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या आहेत. आता सर्वत्र लॉकडाऊन असल्यामुळे मुले कुठेही जाऊ शकत नाहीत आणि कोरोनाचा वाढता प्रादुर्भावामुळे मुले घरीच बसून असतात. मुलांना नवी ऊर्जा, नवीन ताजेपण आणि जीवनात सुंदरमय पहाट देण्याच्या हेतूने पोदार शाळेत उन्हाळ्याच्या सुट्टीच्या दिवसातही विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन योगासनच्या क्लासचे आयोजन करण्यात आले आहे.





योगासन प्रशिक्षक शेख वहिद यांनी योगासन करण्याच्या नियमित सरावामुळे होणारे फायदे सांगितले आहेत. ते असे सर्व स्तरांवर तंदुरुस्ती वजन कमी होण्यास मदत होते.

ताण तणावा पासून मुक्ती मिळण्यास मदत होते. अंर्तयामी शांतता प्राप्त होते. रोगप्रतिकारक शक्तीत वाढण्यास मदत होते. उर्जा शक्ती वाढण्यास मदत होते. शरीराचा लवचिकपणा आणि शरीराची ठेवण सुधार होतो.

योगासनामुळे फक्त शरीरासह मनाचाही विकास होतो.सकारात्मक विचार मनामध्ये निर्माण होऊन मानसिक ताण कमी होण्यास मदत होते. नियमितपणे किमान अर्धा तास योगासनासाठी दिल्यास आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडू शकतो आणि मानसिक व शरीरिक स्वास्थ्य लाभू शकते. म्हणून विद्यार्थ्यांनी नियमित योगासने करावीत. पोदार शाळेत घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन योगासनच्या क्लासमध्ये विद्यार्थी मोठ्या उत्साहाने योगासन करतांना दिसत आहेत.

शाळेतील शिक्षक प्रयाग मोटघरे आणि संतोष दिपके योगासनाच्या ऑनलाईन क्लासचे आयोजन यशस्वीपणे करत आहेत.





# पोदार शाळेमध्ये योगासनाचे धडे



हिंगोली : पोदार शाळेमध्ये उन्हाळ्यात विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन योगासनाच्या क्लासचे आयोजन करण्यात आले आहे.

हिंगोली : योगासने केल्याने मन, शरीर आणि श्वास यांचे एकमेकांशी संतुलन राखले जाते आणि त्यामुळे आपल्या जीवनातील दिवसाचा प्रवास उत्साही, शांत, आनंदी आणि सर्वार्थाने सफल होण्यास मदत होते, असे प्रतिपादन शाळेचे प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांनी योगासनाच्या ऑनलाइन क्लासबद्दल बोलताना केले. येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये वर्षभरापासूनच ऑनलाइन शिकवणी वर्ग सुरु आहेत. पण आता मुलांना उन्हाळ्याच्या सुटी लागल्या आहेत. सर्वत्र लॉकडाउन असल्यामुळे मुले कुठेही जाऊ शकत नाहीत आणि कोरोनाचा वाढता प्रादुर्भावामुळे मुले घरीच बसून असतात. मुलांना नवी ऊर्जा, नवीन ताजे तवानेपणा आणि जीवनात सुंदरमय पहाट देण्याच्या हेतूने पोदार शाळेत उन्हाळ्याच्या सुटीच्या दिवसातही विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन योगासनच्या क्लासचे आयोजन करण्यात आले आहे. योगासन प्रशिक्षक शेख वहिद यांनी योगासन करण्याच्या नियमित सरावामुळे होणारे फायदे सांगितले आहेत. शाळेतील शिक्षक प्रयाग मोटघरे, संतोष दिपके योगासनाच्या ऑनलाइन क्लासचे आयोजन करत आहेत.

सकाळ



**हिंगोली : पोदार स्कूलमध्ये रविवारी मातृदिनाच्या सोहळा ऑनलाइन साजरा करण्यात आला. यात सहभागी झालेली मुले आणि त्यांची आई.**

# मातृदिनाचा सोहळा ऑनलाइन साजरा

**हिंगोली, ता. ९ (बातमीदार) :** येथील पोद्दार स्कूलमध्ये रविवारी (ता. नऊ) मातृदिनाच्या सोहळा ऑनलाइन साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांनी मार्गदर्शन केले.

ते म्हणाले की, आई मुलांसाठी संस्काराची शिदोरी असते. आई नावाच्या विद्यापीठातून मुले संस्काराची शिदोरी घेऊन आपल्या जीवन मार्गाचा सुखकर प्रवास सुरु करत असतात. आई म्हणजे प्रेम, काळजी, चिंता, त्याग आणि शीतलता या गुणांची बरसात आपल्या मुलांवर दिवसरात्र करत असते. आपल्या मुलांवर निस्सीम प्रेम करणारी आई. आपल्या मुलांवर सर्वोत्तम संस्कार आणि उत्तम शिक्षण मिळावे, यासाठी अहोरात्र प्रयत्न करत असते असे सांगितले. यावेळी मुलांसाठी विविध ऑनलाइन उपक्रम घेण्यात आले होते. त्यामध्ये मुलांनी आपल्या आईला घरकामात मदत करणे. आईला वृक्षरोप स्नेहभेट म्हणून देणे, स्वतः तयार केलेल्या विविध उपक्रमाच्या माध्यमातून मातृदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षकांनी पुढाकार घेतला.

Nanded, Hingoli-Today1
10/05/2021 Page No. 3



# media coverage

**2021-22**

Since 1927
PODAR INTERNATIONAL SCHOOL
MORE THAN GRADES

Since 1927

# आई.... सूर्याच्या तेजस्वीतेचे प्रतीक.. !

**प्रेमस्वरूप आई ! वात्सल्यसिंधु आई**

आईच्या प्रेमाची आणि वात्सल्याची महती कवी माधव ज्युलियन यांनी आपल्या कवितेतून अतिशय सुंदर अश्या शब्दात केली आहे. आई म्हणजे मातृत्वाचा अखंड वाहणारा झरा आणि तीच्या प्रेमाच्या वात्सल्यात आपण दररोजच न्हाऊन निघत असतो. अश्या या दैवतस्वरूप आईला माझी कोटी कोटी वंदन.

**आई.... सत्यम, शिवम, सुंदरम**

आई त्या रूपामध्ये सत्यम शिवम आणि सुंदरमचे दर्शन घडते. सत्यम म्हणजे सत्य हे सत्यच असते. जगात नेहमी सत्याचाच विजय होतो. शिवम म्हणजे कल्याणकारी, शुभ, पवित्र, शांती, सुख, आनंद आणि प्रेम देणारी शक्ती. सुंदरम म्हणजे सर्व प्रकारची सुंदरता.. मनाची, गुणांची आणि आदराची..

आई नेहमी आपल्याला सत्य बोलायला शिकवते. आपल्यासाठी कल्याणकारी, शुभ आणि मंगलमय अश्याच विचारांची शिदोरी देते आणि आपले मन सुंदर आणि पवित्र ठेवण्यास सांगत असते. म्हणूनच म्हणावसं वाटतं की आई म्हणजे सत्यम, शिवम, सुंदरम चे अनमोल रूप आहे.

**आई पहिला गुरु आणि मार्गदर्शक**

आई माझा गुरु . आई माझा कल्पतरू,
आईचे प्रेम आकाशाहून मोठे
आणि सागराहूनही खोल आहे.' असा आईचा गौरव साने गुरुजी यांनी केला आहे. म्हणूनच म्हणतात की आई आपली प्रथम गुरु असते. ती आपल्याला बोलायला, चालायला, लिहायला आणि वागायला शिकवते . आपल्यावर चांगले संस्कार करून जगण्याची एक दृष्टी देते . एक माणूस म्हणून जगण्याचं बळ देते.



तिच्या संस्कारांतून, तिच्या वागण्या-बोलण्यांतून आणि तिच्या कृतितून आपली जडण - घडण होत असते. माँ जिजाऊने शिवाजी महाराज यांना स्वराज्याची प्रेरणा दिली. महात्मा गांधीजींच्या मनात सत्याचा आग्रह करण्याचे बीज त्यांच्या आईने रुजवले. विनोबांना भूदानाची कल्पना त्यांच्या आईच्याच शिकवणुकीतून सुचली होती. आपली आईही आपल्यासाठी प्रेरणादायी स्त्रोत असते. आपली खरी गुरु आणि मार्गदर्शक असते.

**आई... ईश्वराचे प्रतीक**

आ म्हणजे आत्मा आणि ई म्हणजे ईश्वर यांचा देवी साक्षात्कार म्हणजे आई होय. आई हा शब्दच किती गोड आहे. त्या शब्दात अनमोल असे माधुर्य भरलेले आहे. सारे विश्व या शब्दात सामावलेले दिसत असते . आई हा शब्दातच प्रेम,माया आणि अपार ममता आपणास जाणवतात. जगात ईश्वराचे दुसरे रूप म्हणजे आई असते.

'ईश्वर हा प्रत्येक मुलांसोबत राहू शकत नाही म्हणून त्याने आईला बनवलं आहे.' असे म्हटले जाते.आई ही बाळाचे सर्वस्व असते. गर्भात असल्यापासूनच मूल आपल्या मातेवर अवलंबून असते. प्रसूतीच्या मरणप्राय वेदना सहन करून ती आपल्या बाळाला जन्म देते. बाळाला जन्म दिल्यानंतर ती त्याला मायेच्या स्पर्शाने औंजारते -गोंजारते. त्यातूनच बाळाला जगण्याची नवी ऊर्जा मिळते. आईच्या पालन पोषण आणि संस्कारांच्या बळावर बाळ लहानाचे मोठे होते.

**आई... जगण्याचा श्वास**

आई खरंच काय असते,
लेकराचा धाय असते, वासराची गाय असते ,दुधावरची साय असते, लेकराची माय असते
आई असते जन्माची शिदोरी
सरतही नाही आणि उरतही नाही. असे
' आई ' या कवितेतून फ. मु. शिंदे यांनी आईची महान थोरवी सांगितली आहे. खरंच आई काय असते? वासराची गाय आणि दुधावरची साय असते. सृष्टीचे सर्वश्रेष्ठ रूप आईला मानले जाते. जगातील पवित्र, मंगल, उदात्त, भव्य -दिव्य ते सर्व मातृरूप होऊन प्रकट होते.

लहान मुलांचा श्वास, जगणं आणि सारे विश्वच आई असते. आपल्या मुलांना जराशीही दुःख होऊ नये म्हणून आई जीवाचे रान करत असते आणि तळहातावरील फोडा प्रमाणे आपल्या पिल्लूयाला जपत असते.

आई... चंद्राच्या विशाल हृदयाचे प्रतीक

हृदयाच्या मखमली पेटीत ठेवण्यासारखी दोनच अक्षरे आहेत; ती म्हणजे आई! जीवनात येणाऱ्या सुखदु:खाच्या भेवरात अडकलेल्या आपल्या बाळाला धीर देण्यासाठी आई चंद्रमासारखी झिजत असते.

आईने आपल्या मुलाला कितीही मारले तरी पुन्हा मूल तिच्याच कुशीत शिरत असते , कारण आईच्या रागामागेही प्रेमचं असतं हे त्याला माहीत असतं म्हणूनच साने गुरुजी म्हणतात-

फुलामध्ये फूल। हुंगावे जाईचे
सुख भोगावे आईचे। बालपणी।
माऊली माऊली। कल्पवृक्षाची साऊली
तान्हेबाळा लागी दिली। देवाजीने.

आई आपल्या जीवनाला आकार देते असते. आपल्या अंधकारमय जीवनाला उजळून प्रकाशमय करत असते. आईच चंद्राच्या शीतल हृदयासारखं आपल्याला शीतल छायेत वाढवत असते.

**आई... निस्सीम प्रेमाची मूर्ती**

आईची महिमा सांगताना प्रसिद्ध गीतकार शांताराम नांदगावकर म्हणतात, ''माझ्या जीवनात मी आईला ईश्वराचे स्थान देतो.'' आई आपल्या मुलांच्या जीवनाला आकार देणारी वात्सल्यमूर्ती असते. आई कधी रागावते, मारते पण मुलांच्या कल्याणासाठी अखंड प्रयत्न करत असते. आईचे प्रेम, तिने केलेले संस्कार, तिच्या शिकवणुकीचे चार शब्द या सार्यांचा आपल्या जडणघडणीत खूप मोठा वाटा असतो! ही शिदोरीच आपल्याला जीवनभर सोबतीला असते. संघर्षाच्या, सुख-दुःखाच्या कसोटीच्या प्रसंगात मोलाची ठरते.आईची माया - ममता आणि प्रेम हे निस्सीम असते

**आई : वात्सल्याचा झरा**

आई म्हणजे आपल्यासाठी अखंड वाहणारा वात्सल्याचा झरा आहे. साऱ्या विश्वात आई सर्वात श्रेष्ठ आहे. आपल्या मुलांवर बालपणापासूनच योग्य संस्कार देणारी आई जगातील आपला पहिला गुरु आणि मार्गदर्शक होय. आई स्वतः भुकी राहते पण आपल्याला अन्न देते. आई आपल्यासाठी स्वतःचे संपूर्ण जीवन बलिदान करतांना दिसत असते. आई नेहमीच स्वतः चे सुख दुःख विसरून आपल्याला नेहमी आनंदी ठेवण्याचा सतत प्रयत्न करत असते.

विनोबा भावेंसारखे थोर देशभक्त आईची महिमा गातांना म्हणतात, की 'आईची पूजा म्हणजे वात्सल्याने उभ्या राहिलेल्या परमेश्वराची पूजा. आई म्हणजे निस्सीम सेवेची मूर्ती होय

**आई... सूर्याचे तेजस्वीता**

सूर्यकिरणांच्या स्पर्शाने कमळ उमलतात तशी आईच्या वात्सल्यरूपी प्रेमाने बालकाची जीवनकळी उमलत असते. आकाशाहून अथांग अन् सागराहून विशालतेचे प्रतिक बनून आई आपल्या बालकाला जीवनाचे धडे शिकवित असते . आई आपल्याला बाळाला संस्काराची शिदोरी जन्मभर देत असते. जगात त्याला पावली पावली येणाऱ्या संकटातून मार्ग काढण्याची, ध्येय गाठण्याची चिकाटी बाळगण्याची शक्ती देत असते.

आई... जगण्याच्या लढाईतील महान योद्धा..

आई आपल्या मुलांवर येणारी हजारो संकटे स्वतः वर घेऊन त्या संकटावर यशस्वी मात करणारी एक महान योद्धा असते. मुलांना संघर्षाच्या मैदानात यशाचा मार्ग दाखवते. विजय मिळवून देते. दुःखाच्या सहवासात देखील आपले सकारात्मक मनोबल वाढवून दुःखाशी लढायला शिकवते.

आपल्या पिलाला पंखाचे पाठबळ देऊन लढाईच्या मैदानात समोर उभी राहणारी आई.. म्हणजे लढाईतील धनुर्धर योद्धयासारखी भासते. आपल्या मुलांसाठी जगातील सर्व शक्तीशी लढण्याची शक्ति फक्त आणि फक्त आईच्या सामर्थ्यात असते. म्हणूनच केजीएफ मधील अभिनेता यश म्हणतो की, इस दुनिया मे सबसे बडा योद्धा माँ होती है व माँ से बडा कोई ताकतवर नही होता है

**स्वामी तिन्ही जगाचा... आईविना भिकारी**

आई असे पर्यंत तिची किंमत आपल्याला आणि घरच्यांना देखील कळत नाही पण ती नसली की आपल्या तिची खरी किंमत कळते.तीच्या असण्याचे महत्व कळते. आई नसलेल्या बाळाला विचारा आई नसल्याचे दुःख. आई नाही तर काहीच नाही. हे सारे विश्व स्मशान वाटते. आई नसल्याने अनंत यातना सहन कराव्या लागतात. आई नसल्याचे दुःख व्यक्त करतांना कवी यशवंत म्हणतात..

आई म्हणोनी कोणी । आईस हाक मारी ती हाक येई कानी। मज होय शोककारी नोहेची हाक माते। मारी कुणी कुठारी ,आई कुणा म्हणू मी? आई घरी न दारी ही न्यूनता सुखाची। चित्ती सदा विदारी स्वामी तिन्ही जगाचा। आईविना भिकारी.

या जगात आई नसेल तर तिन्ही जगाचा स्वामी देखील भिकाऱ्या सारखा राहण्यास मजबूर होतो. आई नसल्यामुळे बालकांचे सारे जगच करपून जाते. जगातील सारे दुःखे त्याच्या वाट्याला येतात आणि हे सुंदर जीवन नकोसे होते. जीवनच आळणी होते. म्हणून मला म्हणावेसे वाटते की,



'आई नसते तेव्हा काहीच नसतं
आपलं म्हणणार कुणीच नसतं
प्रेम माया लावणार ,कुणीच मिळत नसतं ,सर्वत्र अंधार पसरतो
प्रकाश दाखवणार कुणीच भेटत नसतं

समुद्राचे औदार्य, चंद्राची शीतलता, सूर्याची प्रखरता, पृथ्वीची विशालता यांचा सुरेख संगम म्हणजे आई.आईच्या मायेत स्वर्ग असते म्हणून आपण आपल्या आईची मनोभावे सेवा करावी.

**चंद्रकांत बांगरे**
प्रधापाल
पोदार इंटरनॅशनल स्कूल, हिंगोली





गोदातीर समाचार

पान २

# आई....सूर्याच्या तेजस्वीतेचे प्रतीक

मस्वरूप आई!

वात्सल्यसिंधु आई

आईच्या प्रेमाची आणि वात्सल्याची महती कवी माधव ज्युलियन यांनी आपल्या कवितेतून अतिशय सुंदर अश्या शब्दात केली आहे. आई म्हणजे मातृत्वाचा अखंड वाहणारा झरा आणि तीच्या प्रेमाच्या वात्सल्यात आपण दररोजच न्हावून निघत असतो. अश्या या देवतास्वरूप आईला माझे कोटी कोटी वंदन.

आई.... सत्यम, शिवम, सुंदरम

आई च्या रूपामध्ये सत्यम शिवम आणि सुंदरमचे दर्शन घडते. सत्यम म्हणजे सत्य हे सत्यच असते. जगात नेहमी सत्याचाच विजय होतो. शिवम म्हणजे कल्याणकारी, शुभ, पवित्र, शांती, सुख, आनंद आणि प्रेम देणारी शक्ती. सुंदरम म्हणजे सर्व प्रकारची सुंदरता.. मनाची, गुणांची आणि आदराची..

आई नेहमी आपल्याला सत्य बोलायला शिकवते. आपल्यासाठी कल्याणकारी, शुभ आणि मंगलमय अश्याच विचाराची शिदोरी देते आणि आ-पले मन सुंदर आणि पवित्र ठेवण्यास सांगत असते. म्हणूनच म्हणावसं वाटतं की आई म्हणजे सत्यम, शिवम, सुंदरम चे अनमोल रूप आहे.

आई पहिला गुरु आणि मार्गदर्शक

आई माझा गुरू : आई माझे कल्पतरू,

आईचे प्रेम आकाशाहून मोठे


आणि सागराहूनही खोल आहे.' असा आईचा गौरव साने गुरुजी यांनी केला आहे.म्हणूनच म्हण-तात की आई आपली प्रथम गुरु असते. ती आपल्याला बोलायला, चालायला, लिहायला आणि वागायला शिकवते . आपल्यावर चांगले संस्कार करून जगण्याची एक दृष्टी देते. एक माणूस म्हणून जगण्याचं बळ देते.

तिच्या संस्कारांतून, तिच्या वागण्या-बोलण्यांतून आणि तिच्या कृतीतून आपली जडण - घडण होत असते. माँ जिजाऊने शिवाजी महाराज यांना स्वराज्याची प्रेरणा दिली. महात्मा गांधीजींच्या मनात सत्याचा आग्रह करण्याचे बीज त्यांच्या आईने रुजवले. विनोबांना भूदानाची कल्पना त्यांच्या आईच्याच शिकवणुकीतून सुचली होती. आपली आईही आपल्यासाठी प्रेरणादायी स्रोत असते. आपली खरी गुरु आणि मार्गदर्शक असते.

**आई... ईश्वराचे प्रतीक**

आ म्हणजे आत्मा आणि ई म्हणजे ईश्वर यांचा देवी साक्षात्कार म्हणजे आई होय. आई हा शब्दच किती गोड आहे. त्या शब्दात अनमोल असे माधुर्य भरलेले आहे. सारे विश्व या शब्दात सामावलेले दिसत असते. आई हा शब्दातच प्रेम, माया आणि अपार ममता आपणास जाणवतात. जगात ईश्वराचे दुसरे रूप म्हणजे आई असते.

'ईश्वर हा प्रत्येक मुलांसोबत राहू शकत नाही म्हणून त्याने आईला बनवलं आहे.' असे म्हटले जाते. आई ही बाळाचे सर्वस्व असते. गर्भात असल्यापासूनच मूल आपल्या मातेवर अवलंबून




असते. प्रसूतीच्या मरणप्राय वेदना सहन करून ती आपल्या बाळाला जन्म देते. बाळाला जन्म दिल्यानंतर ती त्याला मायेच्या स्पर्शाने ओंजारते -गोंजारते. त्यातूनच बाळाला जगण्याची नवी ऊर्जा मिळते. आईच्या पालनपोषण आणि संस्काराच्या बळावर बाळ लहानाचे मोठे होते.

आई... जगण्याचा श्वास

आई खरंच काय असते,
लंगड्याचा पाय असते,
वासराची गाय असते
दुधावरची साय असते, लेकराची माय असते
आई असते जन्माची शिदोरी

सरतही नाही आणि उरतही नाही. असे 'आई' या कवितेतून फ. मु. शिंदे यांनी आईची महान थोरवी सांगितली आहे. खरंच आई काय असते? वासराची गाय आणि दुधावरची साय असते. सृष्टीचे सर्वश्रेष्ठ रूप आईला मानले जाते. जगा-तील पवित्र, मंगल, उदात्त, भव्य -दिव्य ते सर्व मातृरूप होऊन प्रकट होते.

लहान मुलांचा श्वास, जगणं आणि सारे विश्वच आई असते. आपल्या मुलांना जरासेही दु:ख होऊ नये म्हणून आई जीवाचे रान करत असते आणि तळहातावरील फोडा प्रमाणे आपल्या पिल्लूयाला जपत असते.

**आई... चंद्राच्या विशाल हृदयाचे प्रतीक**

हृदयाच्या मखमली पेटीत ठेवण्यासारखी दोनच अक्षरे आहेत; ती म्हणजे आई! जीवनात येणाऱ्या सुखदु:खाच्या फेंयात अडकलेल्या आपल्या बाळाला धीर देण्यासाठी आई चंदनासारखी झिजत असते.

आईने आपल्या मुलाला कितीही मारले तरी पुन्हा मूल तिच्याच कुशीत शिरत असते; कारण आईच्या रागापाठीमागे प्रेमचं असतं हे त्याला माहीत असतं म्हणूनच साने गुरुजी म्हणतात-

फुलामध्ये फूल। हुंगावे जाईचे
सुख भोगावे आईचे। बालपणी।
माऊली माऊली। कल्पवृक्षाची साऊली
तान्हेबाळा लागी दिली। देवाजीने.

आई आपल्या जीवनाला आकार देते असते. आपल्या अंधकारमय जीवनाला उजळून प्रकाशमय करत असते. आईच चंद्राच्या शीतल हृदयासारखं आपल्याला शीतल छायेत वाढवत असते.

आई... निस्सीम प्रेमाची मूर्ती

आईची महिमा सांगताना प्रसिद्ध गीतकार शांताराम नांदगावकर म्हणतात, ''माझ्या जीवनात मी आईला ईश्वराचे स्थान देतो.'' आई आपल्या मुलांच्या जीवनाला आकार देणारी वात्सल्यमूर्ती असते. आई कधी रागावते, मारते पण मुलांच्या कल्याणासाठी अखंड प्रयत्न करत असते. आईचे प्रेम, तिने केलेले संस्कार, तिच्या शिकवणुकीचे चार शब्द या साऱ्याचा आपल्या जडणघडणीत खुप मोठा वाटा असतो! ही शिदोरीच आपल्याला जीवनभर सोबतीला असते. संघर्षाच्या, सुख-दु:खाच्या कसोटीच्या प्रसंगात मोलाची ठरते.आईची माया - मम ता आणि प्रेम हे निस्सीम असते

आई : वात्सल्याचा झरा

आई म्हणजे आपल्यासाठी अखंड वाहणारा वात्सल्याचा झरा आहे. साऱ्या विश्वात आई सर्वांत श्रेष्ठ आहे. आपल्या मुलांवर बालपणापासूनच योग्य संस्कार देणारी आई जागतील आपला पहिला गुरु आणि मार्गदर्शक होय.

आई स्वत: भुकी राहते पण आपल्याला अन्न देते. आई आपल्यासाठी स्वत:चे संपूर्ण जीवन बलिदान करतांना दिसत असते. आई नेहमीच स्वत: चे सुख दु:ख विसरून आपल्याला नेहमी आनंदी ठेवण्याचा सतत प्रयत्न करत असते.

विनोबा भावेंसारखे थोर देशभक्त आईची महिमा गातांना म्हणतात, की 'आईची पूजा म्हणजे वात्सलतेने उभ्या राहिलेल्या परमेश्वराची पूजा. आई म्हणजे निस्सीम सेवेची मूर्ती होय

आई... सूर्याचे तेजस्वीता

सूर्यकिरणांच्या स्पर्शानं कमळं उमलावीत तशी आईच्या वात्सल्यरुपी प्रेमानं बालकाची जीवनकळी उमलत असते. आकाशाहून अथांग अन् सागराहून विशालतेचे प्रतिक बनून आई आपल्या बालकाला जी-वनाचे धडे शिकवित असते . आई आपल्याला बाळाला संस्काराची शिदोरी जन्मभर देत असते. जगात त्याला पावलो पावली येणाऱ्या संकटातून मार्ग काढण्याची, ध्येय गाठण्याची चिकाटी बाळगण्याची शक्ती देत असते.

आई... जगण्याच्या लढाईतील महान योद्धा..

आई आपल्या मुलांवर येणारी हजारो संकटे स्वत: वर घेऊन त्या संकटावर यशस्वी मात करणारी एक महान योद्धा असते. मुलांना संघर्षाच्या मैदानात यशाचा मार्ग दाखवते. विजय मिळवून देते. दु:खाच्या सहवासात देखील आपले सकारात्मक मनोबल वाढवून दु:खाशी लढायला शिकवते.

आपल्या पिल्याला पंखाचे पाठबळ देऊन लढाईच्या मैदानात समोर उभी राहणारी आई.. म्हणजे लढाईतील घनघोर यौद्धयासारखी भासते. आपल्या मुलांसाठी जगातील सर्व शक्तीशी लढण्याची शक्ती फक्त आणि फक्त आईच्या सामर्थ्यात असते. म्हणूनच केजीएफ मधील अभिनेता यश म्हणतो की, "इस दुनिया में सबसे बडा योद्धा माँ होती है ख माँ से बडा कोई ताकतवर नही होता है ख "

स्वामी तिन्ही जगाचा ख आईविना भिकारी

आई असे पर्यंत तिची किंमत आपल्याला आणि घरच्यांना देखील कळत नाही पण ती नसली की आपल्या तिची खरी किंमत कळते.तीच्या असण्याचे महत्व कळते. आई नसलेल्या बाळाला विचारा आई नसल्याचे दु:ख. आई नाही तर काहीच नाही. हे सारे विश्व स्मशान वाटते. आई नसल्याने अनंत यातना सहन कराव्या लागतात. आई नसल्याचे दु:ख व्यक्त करतांना कवी यशवंत म्हणतात..

आई म्हणोनी कोणी । आईस हाक मारी
ती हाक येई कानी। मज होय शोककारी
नोहेची हाक माते। मारी कुणी कुठारी
आई कुणा म्हणू मी? आई घरी न दारी
ही न्यूनता सुखाची। चित्ती सदा विदारी
स्वामी तिन्ही जगाचा। आईविना भिकारी.

या जगात आई नसेल तर तिन्ही जगाचा स्वामी देखील भिकाऱ्या सारखा राहण्यास मजबूर होतो. आई नसल्यामुळे बालकांचे सारे जगच करपून जाते. जगातील सारे दु:खे त्याच्या वाट्याला येतात आणि हे सुंदर जीवन नकोसे होते. जीवनचं आळणी होते.

म्हणून मला म्हणावेसे वाटते की,

'आई नसते
तेंव्हा
काहीच नसतं
आपलं म्हणणार कुणीच नसतं
प्रेम माया लावणार
कुणीच मिळत नसतं
सर्वत्र अंधार पसरतो
प्रकाश दाखवणार
कुणीच भेटत नसतं '

समुद्राचे औदार्य, चंद्राची शीतलता, सूर्याची प्रखरता, पृथ्वीची विशालता यांचा सुरेख संगम म्हणजे आई.आईच्या मायेत स्वर्ग असते म्हणून आपण आपल्या आईची मनोभावे सेवा करावी.

**-चंद्रकांत नांगरे**
ग्रंथपाल
ग्रंथालय आणि माहितीशास्त्र
पोदार इंटरनॅशनल स्कूल, हिंगोली

पुढारी

# आई मुलांसाठी संस्काराची शिदोरी : भारद्वाज

**हिंगोली, पुढारी वृत्तसेवा :** आई मुलांसाठी संस्काराची शिदोरी असते.



आई नावाच्या विद्यापीठातून मुले संस्काराची शिदोरी घेऊन आपल्या जीवन मार्गाचा सुखकर प्रवास सुरू करत असतात, असे प्रतिपादन शाळेचे प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज यांनी केले.

जागतिक मातृदिनाचा सोहळा पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला. त्याला शाळेतील विद्यार्थी आणि त्यांच्या मातांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज म्हणाले की, आई म्हणजे प्रेम, काळजी, चिंता, त्याग आणि शीतलता या गुणांची बरसात आपल्या मुलांवर दिवसरात्र करत असते. मुलांवर निस्सीम प्रेम करणारी आई. मुलांवर सर्वोत्तम संस्कार आणि उत्तम शिक्षण मिळावे यासाठी अहोरात्र प्रयत्न करत असते.

या ग्रहावर आई फक्त एक अशी व्यक्ती आहे. जी आपल्या चेहऱ्यावर आनंद आणि हसू पाहू इच्छिते. आई आपल्याला स्वतःवर विश्वास ठेवण्यास शिकवते, आपल्याला सर्वोत्तम कार्य करण्यास प्रोत्साहित करते. मुलांनी आई- वडिलांचा नेहमीच आदर करावा.त्यांना त्रास होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. आई आपल्या हितासाठी जे सांगत असते त्याचे मुलांनी पालन केले पाहिजे आदी विचार यावेळी व्यक्त करण्यात आले.

यावेळी मातृदिनानिमित्त मुलांसाठी विविध ऑनलाईन उपक्रम घेण्यात आले होते. त्यामध्ये मुलांनी आपल्या आईला घरकामात मदत करणे. आईला वृक्षरोप स्नेहभेट म्हणून देणे. आई सोबत कोणत्याही गीतावर नृत्य करणे. आई सोबत गीत गाणे. निर्मळ प्रेमाचे प्रतीक म्हणून फुले भेट देणे. आपल्या आईला स्वतः तयार केलेले ग्रीटिंग कार्ड भेट देणे. अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून मातृदिन साजरा करण्यात आला.

My Parbhani/Hingoli Edition
May 10, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in



media coverage

2020-21

PODAR INTERNATIONAL SCHOOL
MORE THAN GRADES
Since 1927

# पोदार मध्ये परिचारिका दिन ऑनलाइन साजरा

**हिंगोली/प्रतिनिधी :** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये परिचारिका दिवस ऑनलाइन माध्यमातून साजरा करण्यात आला . यावेळी शाळेचे प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज बोलतांना म्हणाले की , कोरोना महामारीच्या काळात जगातील सर्वच नर्सेसने आपले कार्य अत्यंत प्रामाणिकपणे , कठोर मेहनत आणि चिकाटीने करत आहेत. आजच्या नर्सेस ह्या आरोग्य सेवेचे हृदय बनून कार्य करत आहेत.

सर्व जगात दरवर्षी १२ मे हा दिवस जागतिक परिचारिका दिन म्हणून साजरा करण्यात येतो. आरोग्यसेवेचा कणा असलेल्या परिचारिका अहोरात्र रुग्णांना सेवा देत आहेत त्यामुळेच आपण कोरोना महामारीच्या संकटाचा सामना करू शकत आहे. परिचारिका आवाजाचे नेतृत्व - भविष्यातील आरोग्य सेवेसाठी एक दृष्टी या थीम नुसार सर्व जगात परिचारिका दिवस साजरा करण्यात येत आहे.

परदेशी मॅडम आणि दांडेकर मॅडम (नर्स ,शासकीय रुग्णालय , हिंगोली ) आपल्या भाषणातून सांगितले ' कोरोना लॉकडाउन काळात लोकांनी शक्यतो घरीच थांबावे आणि आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, कोरोनाचे लक्षण दिसत असल्यास त्वरीत कोरोना टेस्ट करून उपचार सुरु करावेत असे त्यांनी सांगितले.




कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य मुकुंदराज हुंबे , संतोष दिपके, मोहिनी दिक्षित आणि चंद्रकांत नांगरे यांनी प्रयत्न केले. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शीतल देशपांडे यांनी केले तर ज्ञानदा रोकडे यांनी आभार मानले.

पुढारी

# परिचारिका आरोग्य सेवेचे हृदय बनून कार्य करतात : भारद्वाज

**हिंगोली, पुढारी वृत्तसेवा :** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये परिचारिका दिवस ऑनलाइन माध्यमातून साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे प्राचार्य संजीव कुमार भरद्वाज म्हणाले की, कोरोना महामारीच्या काळात जगातील सर्वच नर्सेस आपले कार्य अत्यंत प्रामाणिकपणे, कठोर मेहनत आणि चिकाटीने करत आहेत. आजच्या नर्सेस ह्या आरोग्य सेवेचे हृदय बनून कार्य करत आहेत.

जगात दरवर्षी १२ मे हा दिवस जागतिक परिचारिका दिन म्हणून साजरा करण्यात येतो. आरोग्यसेवेचा कणा असलेल्या परिचारिका अहोरात्र रुग्णांना सेवा देत आहेत. त्यामुळेच आपण कोरोना महामारीच्या संकटाचा सामना करू शकत आहे. परिचारिका: आवाजाचे नेतृत्व - भविष्यातील आरोग्य सेवेसाठी एक दृष्टी या थीमनुसार सर्व जगात परिचारिका दिवस साजरा करण्यात येत आहे. कोरोना लॉकडाउन काळात लोकांनी शक्यतो घरीच थांबावे आणि आरोग्याची काळजी घ्या. कोरोनाचे लक्षण दिसत असल्यास त्वरीत कोरोना टेस्ट करून उपचार सुरु करावेत असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुकुंदराज हुंबे, संतोष दिपके, मोहिनी दीक्षित आणि चंद्रकांत नांगरे यांनी परिश्रम घेतले.

My Nanded Edition
May 13, 2021 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# कुटुंब : जीवनरुपी वृक्षाचा आधारस्तंभ



'आपल्या कुटुंबासोबत पृथ्वीवर सुंदर जीवनाचा आनंद घ्या' असे प्रसिद्ध शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन म्हणतात. जगातील सर्वात मोठा आनंद कुटुंबातील सदस्यांसोबत राहून एकमेकांवर प्रेम करण्यात आहे. आपल्या कुटुंबातील सर्वच सदस्य आपल्यावर निस्सीम प्रेम करतात. नि:स्वार्थ भावनेने मदत करतात. मार्गदर्शन करतात आणि आपल्याला जीवनात यश मिळवून देण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करतात. खरंच कुटुंब म्हणजे आपल्यासाठी आपले जग असते.

युनायटेड नेशन्सने १५ मे, १९९४ मध्ये सर्वप्रथम जागतिक कुटुंब दिन साजरा केला होता. कुटूंबाप्रति आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे या उद्देशाने जागतिक कुटुंब दिवस साजरा करण्यात येतो. अमेरिकन सामाजिक कार्यकर्ती लिंडा ग्रोवर यांनी 'सिटीजन्स फॉर ग्लोबल सोल्युशन' या चळवळीद्वारे जागतिक कुटुंब दिनाचा जगभर प्रसार आणि प्रचार केला. 'एकत्र या, संवाद साधा, प्रोत्साहन द्या, संपर्क साधा' हे त्यांच्या चळवळीचे मुख्य उद्दिष्ट होते. आज १५ मे रोजी सर्व जगभरात जागतिक कुटुंब दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. भारता-तही तेवढ्याच उत्साहात हा दिवस साजरा करण्यात येत असतो.

भारत हा कुटुंबवत्सल असा देश आहे. वसुधैव कुटुंबकम, हे विश्वची माझे घर, ही आपली भारतीय संस्कृती आजही जपली जात आहे. कुटूंब म्हणजे घरातील सर्वांसाठी नाजूक धागा असतो. तो धागा प्रेम, माया, ममता, त्याग, विश्वास आणि आपुलकीच्या नात्याने घट्ट बांधला जात असतो. कुटूंब म्हणजे पहिली शाळा असते. जिथे जीवनातील सर्व गोष्टी शिकायला मिळतात. अनुभव, मार्गदर्शन, आधार, प्रेम, आदर, मान-सन्मान यासह सर्वात महत्त्वाचे सुसंस्कार मिळतात.

'घर असावे घरासारखे
नकोत नुसत्या भिंती
इथे असावा प्रेम जिव्हाळा
नकोत नुसती नाती ' या कवितेतून कवीने घरात घरपण , प्रेम आणि जिव्हाळा असेल तरच ते खरे घर असते असे म्हटले आहे. घराला घरपण, प्रेम आणि जिव्हाळा हे कुटुंबातील सदस्य देत असतात. कुटुंबातील बाबा नेहमीच मौल्यवान सल्ला देत असतात. आई आपल्यावर निस्सीम प्रेम आणि माया लावत असते. बहीण आणि भाऊ आपले शुभचिंतक बनून आपल्याला कल्याणकारी मार्ग दाखवत असतात. आजी -आजोबा म्हणजे घरातील संस्कारकेंद्र असतात. ते आपल्याला नेहमीच चांगले संस्कार देत असतात. कुटुंबातील प्रत्येक सदस्य एकमेकांनावर जीवतोडून प्रेम करत असतो. म्हणूनच म्हटले जाते की 'कुटुंब हे झाडासारखं असत ते कडक उन्हा-तही आपल्याला थंडगार सावली देत. त्याप्रमाणे कुटुंब आपल्याला प्रत्येक वेळी लाख मोलाचे मार्गदर्शन तर देतेच, शिवाय आपल्या सोबत कोणत्याही कठीण परिस्थितीमध्ये ठामपणे उभे राहते.

'कुटुंब ही अशी जागा आहे जिथे देशाला आशा मिळते आणि जिथे स्वप्नांना पंख मिळतात.' असे जॉर्ज डब्ल्यू बुश म्हणतात. कुटुंबामधील सदस्य स्वप्नांना बळ देऊन ते साकार करण्याची शक्ती देत असतात. भारतीय कुटुंब पद्धती ही महान आणि मौल्यवान असा सांस्कृतिक ठेवा आपल्या सदस्यांना प्रदान करत असते. भारतीय कुटुंब व्यवस्था समृद्ध आणि आदर्श मानली जाते. पण सध्याच्या अत्याधुनिक आणि भौतिकसोयीयुक्त काळात कुटुंब व्यवस्थेला तडे जात आहेत. एकत्र कुटुंब पद्धतीतून विभक्त कुटुंब पद्धती उदयास येत आहे. विभक्त कुटुंबात आई-बाबा आणि त्यांची मुले एवढेच राहतात. कुटुंबामध्ये सर्वांनाच भावनिक, शारीरिक, वैचारिक आणि बौद्धिक पातळीवर सर्वच बाबतीत सहकार्य आणि मदत मिळत असते. आपण केलेल्या कार्याचे आई-बाबापासून सर्वच कौतुक करतात. त्यामुळे जगण्याला नवा उत्साह, नवी ऊर्जा आणि बळ मिळते. पण वाढते शहरीकरण, नोकरी, धंदा, व्यवसायाचे बदलते रूप यामुळे विभक्त कुटुंब पद्धती उदयास येत आहे. विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये शिस्त, कर्तव्याची जाणीव, जिव्हाळा, आपुलकी, माणुसकीची शिकवण आणि एकमेकांवरील जीवापाड प्रेम काळानुसार कमी होत आहे. त्यामुळे विभक्त कुटुंबातील सदस्य एकाकी, हताश, एकलकोंडे, निराश आणि हतबल होताना दिसत आहेत. त्यातच एकमेकांचे सहकार्य आणि समजूतदारपणाचा अभाव यामुळे नात्यात दुरावा निर्माण होत आहेत.

कुटुंब जीवनरुपी वृक्षाचा आधारस्तंभ असतो. कुटुंब समाजातील मूलभूत संस्था आहे. सुसंवाद आणि एकमेकांवर प्रेम असणारे कुटुंब प्रत्येक गोष्टीत यशस्वी होत असते. विठ्ठल महादू खंदारे यांच्या कुटुंबाने माझ्या बालपणीच्या काळात मला भक्कम आधार, माया, ममत्व आणि प्रेम दिले. त्यामुळेचं मी आज या जगात जिवंत आहे. आईचा माझ्या बालपणीच मृत्यू झाल्यामुळे मी पोरखा झालो. माझे वडील आणि अन्य कुणीही माझा सांभाळ करण्यास तयार नव्हते. मला सर्वांनी वाऱ्यावर सोडले होते. खायला अन्न नाही की राहायला घर नाही. माझ्या हाल -अपेष्टा पाहून माझ्या आईच्या कुटुंबाला माझी दया आली. त्यांनी माझा सांभाळ करण्याचे ठरवले. त्यांनी मला त्यांच्या घरी घेऊन गेले. मला प्रेम, माया -ममता, आधार, आणि शिक्षण देऊन जीवनात जगण्याची उमेद दिली. जगण्याची ऊर्जा दिली. त्यांचे ऋण मी कधीही विसरू शकणार नाही. आदर, प्रेम, माया -ममता, विश्वास, जिव्हाळा आणि आपुलकीने ओतप्रोत भरलेले कुटुंब म्हणून विठ्ठल खंदारे यांचे कुटुंब आजही लोकप्रिय आणि प्रसिद्ध आहे. असे प्रेमाने भरलेली करोडो कुटुंबे आजही भारतात आहेत. म्हणूनच म्हटले जाते की, 'कुटुंब हे सुरक्षा कवचाप्रमाणे असते, कुटुंबामध्ये राहून व्यक्तीला सुरक्षा आणि शांततेचा अनुभव येतो. आपली खरी शक्ती आपलं कुटुंब असते.'

कोरोना विषाणूच्या महामारीने सर्व जगात धुमाकूळ घातला आहे. सर्वत्र मृत्यूचे तांडव सुरू आहे. चिंताग्रस्त आणि भयावह वातावरण निर्माण झाले आहे. भारतासह जगात लाखो लोक कोरोनामुळे मृत्यू होत आहे. आपली माणसे आपल्या डोळ्यांसमोर तडफडून जीव सोडून देत आहेत. अशा भयावह परिस्थितीमध्ये आपल्याला भक्कम आणि मजबूत असा पाठिंबा फक्त आणि फक्त कुटुंबातील सदस्य देऊ शकतात याची जाणीव आता सर्वांच होऊ लागली आहे. म्हणूनच लोक आपल्या कुटुंबाची काळजी करू लागली आहेत. मागील वर्षांपासून लोक कुटुंबात लॉकडाऊनच्या सावटाखाली एकत्र राहत आहेत. लोकांना आता कुटुंबाचे आणि कुटुंबातील सदस्याचे महत्त्व कळत आहे. आपल्या कुटुंबातील सदस्याला कोरोना झाला तर जीवाचे रान करून त्याचा जीव वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याची साथ सोडत नाहीत, त्याला जगण्याची हिम्मत देतात, कोरोना विरुद्ध लढण्याचं बळ देतात. प्रसंगी आपल्या तोंडाने त्याला प्राणवायू देतात आणि आपल्या कुटुंबातील सदस्यांची सर्वोतोपरी काळजी घेतली जाते. कुटुंबाचे महत्त्व ओळखून महाराष्ट्र शासनाने 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' या उपक्रमाची सुरुवात केली आहे. आपल्या कुटुंबातील सदस्यांना कोरोना होऊ नये म्हणून काळजी घेतली पाहिजे. कोरोना विषाणूने जगाला दाखवून दिले की आपले कुटुंब आपल्याला भक्कम आधार देते. जगण्याचं बळ देते. कुटुंबात प्रेम, विश्वास, जिव्हाळा आणि आपुलकी ठेवून सर्वांशी प्रेमाने राहावे. तरच जगात शांतता, प्रेम आणि आपुलकीची जोपासना होईल.

**-चंद्रकांत नांगरे**

ग्रंथपाल

पोदार इंटरनॅशनल स्कूल,

हिंगोली





दै. मराठवाडा केसरी

# कुटूंब : जीवनरुपी वृक्षाचा आधारस्तंभ

जागतिक कुटुंब दिन

'आपल्या कुटुंबासोबत पृथ्वीवर सुंदर जीवनाचा आनंद घ्या.' असे प्रसिद्ध शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन म्हणतात. जगातील सर्वात मोठा आनंद कुटूंबातील सदस्या सोबत राहून एकमेकांवर प्रेम करण्यात आहे. आपल्या कुटूंबातील सर्वच सदस्य आपल्यावर निस्सीम प्रेम करतात. नि:स्वार्थ भावनेने मदत करतात. मार्गदर्शन करतात आणि आपल्याला जीवनात यश मिळवून देण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करतात. खरंच कुटुंब म्हणजे आपल्यासाठी आपले जग असते.

युनायटेड नेशन्सने १५ मे, १९९४ मध्ये सर्वप्रथम जागतिक कुटुंब दिन साजरा केला होता. कुटूंबाप्रति आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे या उद्देशाने जागतिक कुटुंब दिवस साजरा करण्यात येतो. अमेरिकन सामाजिक कार्यकर्ती लिंडा ग्रोवर यांनी 'सिटीजन्स फॉर ग्लोबल सोल्युशन' या चळवळीद्वारे जागतिक कुटुंब दिनाचा जगभर प्रसार आणि प्रचार केला. 'एकत्र या, संवाद साधा, प्रोत्साहन द्या, संपर्क साधा' हे त्यांच्या चळवळीचे मुख्य उद्दिष्ट होती.आज १५ मे रोजी सर्व जगभरात जागतिक कुटूंब दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. भारतातही तेवढ्याच उत्साहात हा दिवस साजरा करण्यात येत असतो.

भारत हा कुटुंबवत्सल असा देश आहे. वसुधैव कुटुंबकम, हे विश्वची माझे घर, ही आपली भारतीय संस्कृती आजही जपली जात आहे. कुटूंब म्हणजे घरातील सर्वांसाठी नाजूक धागा असतो. तो धागा प्रेम, माया, ममता, त्याग, विश्वास आणि आपुलकीच्या नात्याने घट्ट बांधला जात असतो. कुटूंब म्हणजे पहिली शाळा असते. जिथे जीवनातील सर्व गोष्टी शिकायला मिळतात. अनुभव, मार्गदर्शन, आधार, प्रेम, आदर,मान -सन्मान यासह सर्वात महत्त्वाचे सुसंस्कार मिळतात.

'घर असावे घरासारखे
नकोत नुसत्या भिंती
इथे असावा प्रेम जिव्हाळा
नकोत नुसती नाती ' या कवितेतून कवीने घरात घरपण , प्रेम आणि जिव्हाळा असेल तरच ते खरे घर असते असे म्हटले आहे. घराला घरपण, प्रेम आणि जिव्हाळा हे कुटूंबातील सदस्य देत असतात. कुटूंबातील बाबा नेहमीच मौल्यवान सल्ला देत असतात. आई आपल्यावर निस्सीम प्रेम आणि माया लावत असते. बहीण आणि भाऊ आपले शुभचिंतक बनून आपल्याला कल्याणकारी मार्ग दाखवत असतात. आजी -आजोबा म्हणजे घरातील संस्कारकेंद्र असतात. ते आपल्याला नेहमीच चांगले संस्कार देत असतात. कुटूंबातील प्रत्येक सदस्य एकमेकांनावर जीवतोडून प्रेम करत असतो. म्हणूनच म्हटले जाते की 'कुटूंब हे झाडासारखं असत ते कडक उन्हातही आपल्याला थंडगार सावली देत. त्याप्रमाणे कुटूंब आपल्याला प्रत्येक वेळी लाख मोलाचे मार्गदर्शन तर देतेच शिवाय आपल्या सोबत कोणत्याही कठीण परिस्थितीमध्ये ठामपणे उभे राहते.

'कुटुंब ही अशी जागा आहे जिथे देशाला आशा मिळते आणि जिथे स्वप्नांना पंख मिळतात. ' असे जॉर्ज डब्ल्यू बुश म्हणतात. कुटुंबामधील सदस्य स्वप्नांना बळ देऊन ते साकार करण्याची शक्ती देत असतात.भारतीय कुटूंब पद्धती ही महान आणि मौल्यवान असा सांस्कृतिक ठेवा आपल्या सदस्यांना प्रदान करत असते. भारतीय कुटुंब व्यवस्था समृद्ध आणि आदर्श मानली जाते. पण सध्याच्या अत्याधुनिक आणि भौतिकसोयीयुक्त काळात कुटुंब व्यवस्थेला तडे जात आहेत. एकत्र कुटुंब पद्धतीतून विभक्त कुटुंब पद्धती उदयास येत आहे. विभक्त कुटूंबात आई -बाबा आणि त्यांची मुले एवढेच राहतात. कुटुंबामध्ये सर्वांनाच भावनिक, शारीरिक, वैचारिक आणि भौतिक पातळीवर सर्वच बाबतीत सहकार्य आणि मदत मिळत असते. आपण केलेल्या कार्याचे आई -बाबापासून सर्वच कौतुक करतात. त्यामुळे जगण्याला नवा उत्साह, नवी ऊर्जा आणि बळ मिळते. पण वाढते शहरीकरण, नोकरी, धंदा, व्यवसायाचे बदलते रुप यामुळे विभक्त कुटुंब पद्धती उदयास येत आहे . विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये शिस्त, कर्तव्याची जाणीव, जिव्हाळा, आपुलकी, माणुसकीची शिकवण आणि एकमेकांवरील जीवापाड प्रेम काळानुसार कमी होत आहे. त्यामुळे विभक्त कुटूंबातील सदस्य एकाकी, हताश, एकलकोंडे, निराश आणि हतबल होताना दिसत आहेत. त्यातच एकमेकांचे सहकार्य आणि समजूतदारपणाचा अभाव यामुळे नात्यात दुरावा निर्माण होत आहेत.

कुटुंब जीवनरुपी वृक्षाचा आधारस्तंभ असतो. कुटूंब समाजातील मूलभूत संस्था आहे. सुसंवाद आणि एकमेकांवर प्रेम असणारे कुटुंब प्रत्येक गोष्टीत यशस्वी होत असते. विठ्ठल महादू खंदारे यांच्या कुटूंबाने माझ्या बालपणीच्या काळात मला भक्कम आधार, माया, ममत्व आणि प्रेम दिले. त्यामुळेच मी आज या जगात जिवंत आहे. आईचा माझ्या बालपणीच मृत्यु झाल्यामुळे मी पोरखा झालो. माझे वडील आणि अन्य कुणीही माझा सांभाळ करण्यास तयार नव्हते. मला सर्वांनी वाऱ्यावर सोडले होते. खायला अन्न नाही की राहायला घर नाही. माझ्या हाल -अपेष्टा पाहून माझ्या आईच्या कुटूंबाला माझी दया आली. त्यांनी माझा सांभाळ करण्याचे ठरवले. त्यांनी मला त्यांच्या घरी घेऊन गेले. मला प्रेम, माया -ममता, आधार, आणि शिक्षण देऊन जीवनात जगण्याची उमेद दिली. जगण्याची ऊर्जा दिली. त्यांचे ऋण मी कधीही विसरु शकणार नाही. आदर, प्रेम, माया -ममता, विश्वास, जिव्हाळा आणि आपुलकीने ओतप्रोत भरलेले कुटुंब म्हणून विठ्ठल खंदारे यांचे कुटुंब आजही लोकप्रिय आणि प्रसिद्ध आहे. असे प्रेमाने भरलेली करोडो कुटूंबे आजही भारतात आहेत. म्हणूनच म्हटले जाते की, 'कुटुंब हे सुरक्षा कवचाप्रमाणे असते , कुटूंबामध्ये राहून व्यक्तीला सुरक्षा आणि शांततेचा अनुभव येतो. आपली खरी शक्ती आपलं कुटुंब असते. '

कोरोना विषाणूच्या महामारीने सर्व जगात धुमाकूळ घातला आहे. सर्वत्र मृत्युचे तांडव सुरु आहे. चिंताग्रस्त आणि भयावह वातावरण निर्माण झाले आहे. भारतासह जगात लाखो लोक कोरोनामुळे मृत्यु होत आहे. आपली माणसे आपल्या डोळ्यासमोर तडफडून जीव सोडून देत आहेत. अशया भयावह परिस्थितीमध्ये आपल्याला भक्कम आणि मजबूत अशा पाठींबा फक्त आणि फक्त कुटूंबातील सदस्य देऊ शकतात याची जाणीव आता सर्वांच होऊ लागली आहे. म्हणूनच लोक आपल्या कुटूंबाची काळजी करु लागली आहेत. मागील वर्षापासून लोक कुटूंबात लॉकडाऊनच्या सावटाखाली एकत्र राहत आहेत. लोकांना आता कुटूंबाचे आणि कुटूंबातील सदस्याचे महत्व कळत आहे. आपल्या कुटूंबातील सदस्याला कोरोना झाला तर जीवाचे रान करून त्याचा जीव वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याची साथ सोडत नाहीत, त्याला जगण्याची हिम्मत देतात, कोरोना विरुद्ध लढण्याचं बळ देतात. प्रसंगी आपल्या तोंडाने त्याला प्राणवायु देतात आणि आपल्या कुटूंबातील सदस्यांची सर्वो तपरी काळजी घेतली जाते. कुटूंबाचे महत्व ओळखून महाराष्ट्र शासनाने 'माझे कुटुंब माझी जबाबदारी ' या उपक्रमाची सुरुवात केली आहे. आपल्या कुटूंबातील सदस्यांना कोरोना होऊ नये म्हणून काळजी घेतली पाहिजे. कोरोना विषाणूने जगाला दाखवून दिले की आपले कुटुंब आपल्याला भक्कम आधार देते. जगण्याचं बळ देते. कुटूंबात प्रेम, विश्वास, जिव्हाळा आणि आपुलकी ठेवून सर्वांशी प्रेमाने राहावे. तरच जगात शांतता, प्रेम आणि आपुलकीची जोपासना होईल.



**चंद्रकांत नांगरे**
प्रिंसिपाल, पोदार इंटरनॅशनल स्कूल, हिंगोली

# पोदारमध्ये जागतिक पालक दिवस साजरा



**हिंगोली/प्रतिनिधी** : येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये जागतिक पालक दिवस ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला.

मुलांच्या उज्वल भविष्यासाठी पालकांचे योगदान महत्वपूर्ण असते. माता -पिता मुलांसाठी संरक्षक, शिक्षक आणि मार्गदर्शक म्हणून रात्रदिवस कार्य करत असतात असे प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज यांनी सांगितले. यावेळी मुलांनी पालकांना जागतिक पालक दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि आभार व्यक्त केले. पालकांसोबत घालवलेल्या आनंददायी क्षणाची सेल्फी काढून पाठवण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.





अमृतमहोत्सवी
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

# सायकल चालवा आणि पृथ्वीचे आरोग्य वाचवा : भारद्वाज

**हिंगोली :** सायकल चालवून आपल्यासह आपल्या पृथ्वीचे आरोग्य जपावे, असे आवाहन प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज यांनी 'सायकल चालावा आणि पृथ्वीचे आरोग्य वाचावा' या उपक्रमाच्या माध्यमातून केले आहे. येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये जागतिक सायकल दिवस ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला. सायकल चालवून आपल्या आरोग्यसह पृथ्वीच्या आरोग्य देखील संतुलित राखण्यास मदत होते म्हणून विद्यार्थ्यांनी नियमितपणे सायकल चालवावी. शाळेतील विद्यार्थ्यांनी सायकल दिवसाच्या निमित्ताने पुन्हा एकदा सायकल चालवून आपल्या आरोग्यसह पृथ्वीचे आरोग्य जपण्याची प्रतिज्ञा घेतली. सायकल चालवल्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्य संतुलित राहू शकते. तसेच या उपक्रमाच्या माध्यमातून शाळेतील असंख्य विद्यार्थ्यांनी सायकल चालवली.





# व्हर्च्युअल शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये नावीन्यपूर्ण आणि सृजनात्मक कौशल्य विकसित करणे आवश्यक

देशोन्नती वृत्तसंकलन...

**प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज**

**हिंगोली**: येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज यांनी 'अ‍ॅथोस एज्यूसोलूशन्स आणि पुणेकर न्यूज' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'एज्युकेशन २०२५ रीइमेजिनिंग स्कूल्स ऑफ द फ्युचर' या ऑनलाईन लाईव्ह चर्चासत्रात विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांना मार्गदर्शन केले. तसेच या चर्चासत्रात अमृता प्रभू, प्राचार्या एचडीएफसी स्कूल, पुणे, पल्लवी नाईक प्राचार्या डॉ. कलमाडी शामराव हायस्कूल पुणे यांनीही मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले.

ऑनलाईन शिक्षणामधील शिक्षकांच्या समस्या आणि आव्हान व भविष्यातील शिक्षण पद्धती या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेल्या या चर्चासत्रात बोलतांना प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज म्हणाले की, 'कोव्हिड १९ च्या प्रादुर्भावामुळे शैक्षणिक प्रणालीमध्ये मूलगामी परिवर्तन घडून आले असून शिक्षणाचा चेहरा मोहराच बदलून गेला आहे. पारंपरिक शिक्षणाचा सर्वोत्तम पर्याय म्हणून व्हर्च्युअल शिक्षण वृद्धिंगत होत आहे. ऑनलाइन शिक्षण जरी विद्यार्थ्यांना पारंपारिक शिक्षण प्रणालीपेक्षा गुणवत्तापूर्ण वाटत नसले तरी कोरोनाने निर्माण केलेल्या आजच्या विदारक परिस्थितीमध्ये ऑनलाइन शिक्षण हा एक प्रभावशाली राजमार्ग ठरत आहे. शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांसमोर ऑनलाईन शिक्षणाचे एक मोठे आव्हान उभे राहिले होते. शिक्षक कसे शिकवतील आणि शिक्षकांने शिकवलेले मुलांना समजेल की नाही. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा मुलांच्या मानसिक आरोग्यावर काय परिणाम होईल याची विद्यार्थ्यांसह पालकांना चिंता लागली होती. पण अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि विविध नवीन अ‍ॅपचा वापर करून शिक्षक अत्यंत सहज, नव-नव्या उपक्रम आणि संकल्पनाद्वारे विद्यार्थ्यांना शिक्षण देऊ लागले. त्यामुळे विद्यार्थ्यांचे ज्ञानार्जन सहज आणि सोपे झाले. ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण आणि सर्जनशील कौशल्ये विकसित करणे शक्य आहे. सर्वोत्तम आणि गुणवत्तापूर्ण ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य करणे शक्य आहे.' ऑनलाईन क्लासबद्दल बोलतांना



अमृता प्रभू आणि पल्लवी नाईक म्हणल्या की, 'कोव्हिड १९ साथीच्या रोगापूर्वी ई-लर्निंग पद्धतीचा उपयोग विद्यार्थी आणि शिक्षक दोघेही फारच क्वचितच करत असत. पण कोरोना विषाणूमुळे निर्माण झालेल्या चिंताजनक परिस्थिती मध्ये ऑनलाइन शिक्षण हे विद्यार्थी आणी शिक्षक यांच्या मध्ये संवाद साधण्याचे उत्तम साधन आहे. फेस टू फेस लर्निंग पद्धती सर्वोत्तम आहेच पण भविष्यात ई-लर्निंग देखील एक प्रभावी शिक्षण प्रणाली म्हणून भूमिका घेऊ शकते. या चर्चासत्रास राज्यभरातील विद्यार्थ्यांसह त्यांचे पालक मोठ्या संख्येने ऑनलाईन माध्यमातून उपस्थित होते. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विवेक प्रकाश यांनी केले. (प्रतिनिधी)

ePaper देशोन्नती
Tue, 08 June 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/60995490

हिंगोली
Email : daily.marathwadakesri@gmail.com
मंगळवार
08.06.2021
04

# पोदारमध्ये ऑनलाइन चर्चासत्राला प्रतिसाद

**हिंगोली/प्रतिनिधी** : येथील दार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य जीव कुमार भारद्वाज यांनी 'अ‍ॅथोस ज्यूसोलूशन्स आणि पुणेकर न्यूज' ांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लेल्या 'एज्युकेशन २०२५ - इमेजिनिंग स्कूल्स ऑफ द फ्युचर ा ऑनलाईन लाईव्ह चर्चासत्रात ाार्थी, पालक आणि शिक्षक यांना र्गदर्शन केले. तसेच या चर्चासत्रात मृता प्रभू, प्राचार्या - एचडीएफसी कूल, पुणे, पल्लवी नाईक प्राचार्या - ं. कलमाडी शामराव हायस्कूल, पुणे ांनीही मार्गदर्शन केले.

ऑनलाईन शिक्षणामधील ाक्षकांच्या समस्या आणि आव्हान भविष्यातील शिक्षण पद्धती या षयावर चर्चासत्राचे आयोजन रण्यात आलेल्या या चर्चासत्रात लतांना प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज म्हणाले की, कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे शैक्षणिक प्रणालीमध्ये मूलगामी परिवर्तन घडून आले असून शिक्षणाचा चेहरा - मोहराच बदलून गेला आहे. पारंपरिक शिक्षणाचा सर्वोत्तम पर्याय म्हणून व्हर्च्युअल शिक्षण वृद्धिंगत होत आहे. ऑनलाइन शिक्षण जरी विद्यार्थ्यांना पारंपारिक शिक्षण प्रणालीपेक्षा गुणवत्तापूर्ण वाटत नसले तरी कोरोनाने निर्माण केलेल्या आजच्या विदारक परिस्थितीमध्ये ऑनलाइन शिक्षण हा एक प्रभावशाली राजमार्ग ठरत आहे.

शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांसमोर ऑनलाईन शिक्षणाचे एक मोठे आव्हान उभे राहिले होते. शिक्षक कसे शिकवतील आणि शिक्षकांने शिकवलेले मुलांना समजेल की नाही. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा मुलांच्या मानसिक आरोग्यावर काय परिणाम होईल याची विद्यार्थ्यांसह पालकांना चिंता लागली होती. पण अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि विविध नवीन अ‍ॅपचा वापर करून शिक्षक अत्यंत सहज, नव- नव्या उपक्रम आणि संकल्पनाद्वारे विद्यार्थ्यांना शिक्षण देऊ लागले. त्यामुळे विद्यार्थ्यांचे ज्ञानार्जन सहज आणि सोपे झाले. ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण आणि सर्जनशील कौशल्ये विकसित करणे शक्य आहे. सर्वोत्तम आणि गुणवत्तापूर्ण ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य करणे शक्य आहे.

ऑनलाईन क्लासबद्दल बोलतांना अमृता प्रभू आणि पल्लवी नाईक म्हणल्या की, कोविड १९ साथीच्या रोगापूर्वी ई-लर्निंग पद्धतीचा उपयोग विद्यार्थी आणि शिक्षक दोघेही फारच क्वचितच करत असत. पण




कोरोना विषाणूमुळे निर्माण झालेल्या चिंताजनक परिस्थिती मध्ये ऑनलाइन शिक्षण हे विद्यार्थी आणी शिक्षक यांच्या मध्ये संवाद साधण्याचे उत्तम साधन आहे. फेस टू फेस लर्निंग पद्धती सर्वोत्तम आहेच पण भविष्यात ई -लर्निंग देखील एक प्रभावी शिक्षण प्रणाली म्हणून भूमिका घेऊ शकते.

या चर्चासत्रास राज्यभरातील विद्यार्थ्यांसह त्यांचे पालक मोठ्या संख्येने ऑनलाईन माध्यमातून उपस्थित होते. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेक प्रकाश यांनी केले.



**media coverage**

breaking reporter interview tv press video professional business read newspaper daily work

**2020-21**

PODAR INTERNATIONAL SCHOOL
MORE THAN GRADES
Since 1927

लोकमत

# ऑनलाइन चर्चासत्रातून शिक्षण पद्धतीचे मार्गदर्शन

## संजीवकुमार भारद्वाज यांचे प्रतिपादन



ऑनलाईन शिक्षणामधील समस्या या विषयावर चर्चासत्र करताना शिक्षक व पालक

लोकमत न्यूज नेटवर्क

**हिंगोली :** अँथोस एज्युसोल्युशन्स आणि पुणेकर न्यूज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ऑनलाइन शिक्षणामधील शिक्षकांच्या समस्या आणि आव्हाने व भविष्यातील शिक्षण पद्धती' या विषयावर नुकतेच ऑनलाइन चर्चासत्र पार पडले. यात येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज, पुणे येथील प्राचार्या अमृता प्रभू, प्राचार्या पल्लवी नाईक आदींनी सहभाग नोंदविला होता. कोरोनामुळे शैक्षणिक प्रणालीमध्ये मूलगामी परिवर्तन घडून आले असून, शिक्षणाचा चेहरामोहराच बदलून गेला आहे. पारंपरिक शिक्षणाचा सर्वोत्तम पर्याय म्हणून व्हर्च्युअल शिक्षण वृद्धिंगत होत असल्याचे यावेळी प्राचार्य भारद्वाज यांनी सांगितले.

या चर्चासत्रास राज्यभरातील विद्यार्थ्यांसह पालकांनी सहभाग घेतला होता. सूत्रसंचालन विवेक प्रकाश यांनी केले.

Hello Hingoli
Page No. 4 Jun 10, 2021
Powered by: erelego.com





# मराठवाडा केसरी

संपादक : नरसिंह घोणे, मो.नं. 9405112000 / 7558796333 कार्य. संपादक : विलास जोशी

वे ■ अंक 60 ■ बुधवार, दि. 16 जून 2021 ■ किंमत 1 रूपया ■ पाने 4 ■ RNI No.: MAHMAR/2016/69786

बातम्या, जाहिराती व निमंत्रणासाठी संपर्क
विलास जोशी
जिल्हा प्रतिनिधी
Cell 7558796333

## पोदार स्कूलमध्ये ३५ रक्तदात्यांनी केले रक्तदान



हिंगोली / प्रतिनिधी : जागतिक रक्तदान दिनाचे अवचित्य साधून येथील पोदार स्कुल मध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी३५ रक्तदात्यांनी रक्तदान केल्याचे प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांनी सांगितले.

शास्त्रज्ञ कार्ल लँडस्टाईनच्या वाढदिवसाच्या निमित्ताने १४ जून हा दिवस जागतिक आरोग्य संघटनेतर्फ 'जागतिक रक्तदान दिवस ' म्हणून अनेक देशात साजरा करण्यात येतो. लोकांना रक्तदानासाठी प्रोत्साहित करणे आणि त्याच्याशी संबंधित गैरसमज दूर करणे ह्या उद्देशाने पोदार शाळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रक्तदानाचे महत्व सांगतांना प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज म्हणाले की, आजच्या कोरोना विषाणूच्या विळख्यात दिवसेंदिवस वाढणारे अपघात आणि विविध गंभीर आजार याच्याशी संबंधित उपचार प्रणालीत रक्त आणि रक्तघटक हे आवश्यक झाले आहेत. म्हणून रक्तदान करावे. रक्तदान हे महान जीवनदान आहे.

रक्तदान केल्याने हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत होते आणि वजन नियंत्रणात राहू शकते तसेच चांगले शारीरिक आरोग्य लाभू शकते म्हणून प्रत्येकाने रक्तदान करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. रक्तदान करा आणि जगाचे स्पंदन कायम ठेवा ' यावर्षीच्या रक्तदान दिनाच्या थीमनुसार रक्तदान करावे आणि आपल्या जगाचे स्पंदन कायम धावते ठेवावे. असे डॉ. स्वाती गुंडेवार यांनी सांगितले.

रक्तदान शिबिरात शाळेतील शिक्षक, शिक्षिका आणि शाळेच्या पालकांनी असे एकूण ३५ रक्तदात्यांनी रक्तदान करून शासकीय रक्त पेढीला मदत केली. जिल्हा सामान्य रुग्णालयात रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्याने रक्तदान करण्यासाठी प्रत्येक शाळा, महाविद्यालयातून , रक्तदान शिबीर घेणे आवश्यक आहे. या कार्यक्रमास डॉ. मंगेश टेहरे, डॉ. निलेश गुंडेवार आणि डॉ. दिपमाला पाटील या उपस्थित होत्या. तसेच रक्तदान शिबीर यशस्वीतेसाठी पोदार स्कुल मधील शिक्षक, कर्मचार्यांनी परिश्रम घेतले. यावेळी शासकीय रक्त पेढीतील बंडू नरवाडे, संदीप धुळे, नितीन हानडगे ,नामदेव खंदारे या कर्मचार्यांनी रक्त पिशवी संकलन केले.



# media coverage

PODAR INTERNATIONAL SCHOOL
MORE THAN GRADES
Since 1927

2021-22

Since 1927

हिंगोली Next — पुरोगामी विचाराचे एकमत

## प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांना ग्लोबल प्रिंसीपल अवार्ड

**हिंगोली / प्रतिनिधी**

येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांना हरियाणाच्या अलर्ट नॉलेज सर्व्हिसेस एज्युकेशन संस्थेतर्फे दिला जाण-ारा ङग्लोबल प्रिंन्सीपल अवार्ड म जाहिर झाला असून मंगळवारी ता. २२ एका ऑनलाईन कार्यक्रम ात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले आहे.



हरियाणा येथील ए. के. एस. या नाविन्यपूर्ण प्रशिक्षण, तंत्रज्ञान, शिक्षण व्यवस्थापन व संशोधनमध्ये काम करणाऱ्या या संस्थेकडून शैक्षणिक क्षेत्रात नावीन्यपूर्ण व कौशल्यधिष्ठीत उपक्रम राबवणाऱ्या प्रिंसीपल यांना दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. यासाठी ११० पेक्षा जास्त देशातील २००० पेक्षा जास्त प्राचार्यांनी नामांकन दिले होते. त्याम ध्ये प्राचार्य भारद्वाज यांना ग्लोबल प्रिंन्सीपल अवॉर्ड जाहिर करून आज ऑनलाईन कार्यक्रमात सन्मानीत करण्यात आले.

प्राचार्य भारद्व-ाज यांनी कोरोनाच्या लॉकडाऊन काळात तंत्रज्ञान आणि सोशल मि डीयाचा प्रभावी उपयोग करून शाळेतील विद्यार्थ्यांना सर्वो त्तम आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले. नावीन्यपूर्ण संकल्पना आणि विविध कृतिशील उपक्रम राबवून विद्यार्थ्यांम ध्ये विविध विषयावर जनजागृती केल्याबद्दल प्राचार्य भारद्वाज यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

## भारद्वाज यांचा गौरव

**हिंगोली, पुढारी वृत्तसेवा :** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांना हरियाणाच्या अलर्ट नॉलेज सर्व्हिसेस एज्युकेशन संस्थेतर्फे दिला जाणारा 'ग्लोबल प्रिन्सिपल अवॉर्ड' जाहीर झाला असून मंगळवारी एका ऑनलाईन कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले आहे.



हरियाणा येथील ए. के. एस. या नावीन्यपूर्ण प्रशिक्षण, तंत्रज्ञान, शिक्षण व्यवस्थापन व संशोधनमध्ये काम करणाऱ्या या संस्थेकडून शैक्षणिक क्षेत्रात नावीन्यपूर्ण व कौशल्यधिष्ठित उपक्रम राबवणाऱ्या प्रिन्सिपल यांना दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. यासाठी ११० पेक्षा जास्त देशांतील २००० पेक्षा जास्त प्राचार्यांनी नामांकन दिले होते. त्यामध्ये प्राचार्य भारद्वाज यांना 'ग्लोबल प्रिन्सिपल अवॉर्ड' जाहीर करून आज ऑनलाईन कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. प्राचार्य भारद्वाज यांनी लॉकडाऊन काळात तंत्रज्ञान आणि सोशल मीडियाचा प्रभावी उपयोग करून शाळेतील विद्यार्थ्यांना सर्वोत्तम आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले. विविध कृतिशील उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये विविध विषयांवर जनजागृती केल्याबद्दल प्राचार्य भारद्वाज यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

# ए.के.एस. एज्युकेशनच्या 'ग्लोबल प्रिंसिपल अवार्ड ' ने प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज यांना सन्मानित

[illegible]

**हिंगोली (प्र.प्र.)** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज यांना ए.के.एस. एज्युकेशनच्या मानाच्या आणि प्रतिष्ठेच्या 'ग्लोबल प्रिंसिपल अवार्ड ' ऑनलाईन प्रदान करण्यात आला आहे. जगभरातील शैक्षणिक क्षेत्रात यशस्वी, नावीन्यपूर्ण, सर्वोत्तम गुणवत्तापूर्ण आणि विविध कौशल्यधिष्ठीत उपक्रम राबवणाऱ्या प्रिंसिपल यांना ए. के. एस. एज्युकेशन सर्व्हिसेस प्रा. लि. कडून दरवर्षी 'ग्लोबल प्रिंसिपल अवार्ड ' प्रदान करण्यात येतो. ए. के. एस. एज्युकेशन ही एक नाविन्यपूर्ण प्रशिक्षण, तंत्रज्ञान, शिक्षण



व्यवस्थापन आणि संशोधन संस्था आहे. सर्वोत्तम आणि नाविन्यपूर्ण कार्य करणाऱ्या प्रिंसिपल यांना 'ग्लोबल प्रिंसिपल अवार्ड ' देऊन त्यांना गौरव करते. जगभरातील ११० पेक्षा जास्त देशातील २००० पेक्षा जास्त प्रिंसिपल यांनी नामिनेशन दिले होते. त्यामध्ये सर्वोत्तम आणि गुणवत्ता शिक्षण तसेच उल्लेखनीय कार्य केलेल्या प्रिंसिपल यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

सन २०२० या वर्षीचा सर्वोत्तम आणि सन्मानीय 'ग्लोबल प्रिंसिपल अवार्ड ' प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज यांना प्रदान करून त्यांनी केलेल्या सर्वोत्तम कार्याचा गौरव करण्यात आला. कोरोना लॉकडाऊन काळात तंत्रज्ञान आणि सोशल मिडियाचा प्रभावी उपयोग करून शाळेतील विद्यार्थ्यांना सर्वोत्तम आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले. नावीन्यपूर्ण संकल्पना आणि विविध कृतिशील उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये विविध विषयावर जनजागृती केल्याबद्दल प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या ऑनलाईन पुरस्कार प्रदान करण्यात आलेल्या सोहळ्यात ते म्हणाले की, ' ग्लोबल प्रिंसिपल अवार्ड या मिळालेल्या पुरस्काराचे सर्व श्रेय माझ्या शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना देण्यात येते. त्यांच्या सहकार्य आणि प्रत्यक्ष परिश्रमामुळे आज पोदार शाळा हिंगोली शहराच्या शैक्षणिक वैभवात दैदिप्यमान आणि उज्ज्वल असे योगदान देत आहे.'



# media coverage

Since 1927
PODAR
INTERNATIONAL SCHOOL
MORE THAN GRADES

**2021-22** Since 1927

## प्राचार्य भारद्वाज यांना 'ग्लोबल प्रिंसिपल अवार्ड'

**हिंगोली/प्रतिनिधी :** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांना ए.के.एस. एज्युकेशनचा मानाचा आणि प्रतिष्ठेचा 'ग्लोबल प्रिंसिपल अवार्ड ' ऑनलाईन प्रदान करण्यात आला आहे.




जगभरातील शैक्षणिक क्षेत्रात यशस्वी, नावीन्यपूर्ण, सर्वोत्तम गुणवत्तापूर्ण आणि विविध कौशल्यधिष्ठीत उपक्रम राबवणाऱ्या प्रिंसिपल यांना ए. के. एस. एकजुकेशन वर्ल्डवाइड प्रा. लि. कडून दरवर्षी 'ग्लोबल प्रिंसिपल अवॉर्ड 'प्रदान करण्यात येतो. ए. के. एस. एज्युकेशन ही एक नाविन्यपूर्ण प्रशिक्षण, तंत्रज्ञान, शिक्षण व्यवस्थापन आणि संशोधन संस्था आहे. सर्वोत्तम आणि नाविन्यपूर्ण कार्य करणाऱ्या प्रिंसिपल यांना 'ग्लोबल प्रिंसिपल अवॉर्ड ' देऊन त्यांचा गौरव करते. जभरातील ११० पेक्षा जास्त देशातील दोन हजार पेक्षा जास्त प्रिंसिपल यांनी नॉमिनेशन दिले होते. त्यामध्ये सर्वोत्तम आणि गुणवत्ता शिक्षण तसेच उल्लेखनीय कार्य केलेल्या प्रिंसिपल यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

सन २०२० या वर्षाचा सर्वोच्च आणि सन्मानीय 'ग्लोबल प्रिंसिपल अवॉर्ड ' प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांना प्रदान करून त्यांनी केलेल्या सर्वोत्तम कार्याचा गौरव करण्यात आला.

कोरोना लॉकडाऊन काळात तंत्रज्ञान आणि सोशल मिडियाचा प्रभावी उपयोग करून शाळेतील विद्यार्थ्यांना सर्वोत्तम आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले. नावीन्यपूर्ण संकल्पना आणि विविध कृतिशील उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये विविध विषयावर जणजागृती केल्याबद्दल प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या ऑनलाईन पुरस्कार प्रदान करण्यात आलेल्या सोहळ्यात ते म्हणाले की, ' ग्लोबल प्रिंसिपल अवॉर्ड या मिळालेल्या पुरस्काराचे सर्व श्रेय माझ्या शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना देण्यात येते. त्यांचे सहकार्य आणि भक्कम पांठिब्यामुळे आज पोदार शाळा हिंगोली शहराच्या शैक्षणिक वैभवात दैदिप्यमान आणि उज्वल असे योगदान देत आहे.

दै. तरूण भारत दि. 23 / 6 / 2021

## संजीवकुमार यांना ग्लोबल प्रिन्सीपल अवार्ड



**तभा वृत्तसेवा,**
**हिंगोली, २२ जून**

येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांना हरियाणाच्या अलर्ट नॉलेज सर्व्हिसेस एज्युकेशन संस्थेतर्फे दिला जाणारा 'ग्लोबल प्रिंन्सीपल अवार्ड ' जाहिर झाला असून मंगळवारी ता. २२ एका ऑनलाईन कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले आहे.

हरियाणा येथील ए. के. एस. या नाविन्यपूर्ण प्रशिक्षण, तंत्रज्ञान, शिक्षण व्यवस्थापन व संशोधनमध्ये काम करणाऱ्या या संस्थेकडून शैक्षणिक क्षेत्रात नावीन्यपूर्ण व कौशल्यधिष्ठीत उपक्रम राबवणाऱ्या प्रिंसीपल यांना दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. यासाठी ११० पेक्षा जास्त देशातील २००० पेक्षा जास्त प्राचार्यांनी नामांकन दिले होते. त्यामध्ये प्राचार्य भारद्वाज यांना 'ग्लोबल प्रिंन्सीपल अवॉर्ड' जाहिर करून आज ऑनलाईन कार्यक्रमात सन्मानीत करण्यात आले.

प्राचार्य भारद्वाज यांनी कोरोनाच्या लॉकडाऊन काळात तंत्रज्ञान आणि सोशल मिडीयाचा प्रभावी उपयोग करून शाळेतील विद्यार्थ्यांना सर्वोत्तम आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले. प्राचार्य भारद्वाज यांनी कोरोनाच्या लॉकडाऊन काळात तंत्रज्ञान आणि सोशल मिडीयाचा प्रभावी उपयोग करून शाळेतील विद्यार्थ्यांना सर्वोत्तम आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले. नावीन्यपूर्ण संकल्पना आणि विविध कृतिशील उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये विविध विषयावर जनजागृती

## आनंददायी जीवनासाठी योगासने महत्त्वाची : संजीव भारद्वाज

**हिंगोली :** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य संजीव भारद्वाज विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, सर्वांनीच आनंददायी जीवन जगण्यासाठी नियमित योगासने करावीत. योगासनामुळे मनावर आणि शरीरावर नियंत्रण मिळवता येते. ज्ञान, प्रेम, करुणा, वात्सल्य आणि सामर्थ्य हे सारे गुण योगातून विद्यार्थ्यांना प्राप्त करता येतात.मानवाचे जीवन विविध ताण -तणाव, साध्य-असाध्य रोगाने ग्रासले आहे.आजच्या धावत्या आणि स्पर्धेच्या जगात स्वत:ला फिट आणि आरोग्य चांगले ठेवण्यासाठी योगासने, प्राणायाम केले पाहिजेत. योग दिवसानिमित्त विद्यार्थ्यांना योगासने आणि योगाचे महत्त्व कळावे यासाठी योगा प्रश्नावलीचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका अश्विनी जाधव यांनी केले.उपप्राचार्य मुकुंदराज हुंबे, शेख वहिद आणि संतोष दिपके यांच्यासह शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी

## पोदार स्कूल

**हिंगोली :** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात प्राचार्य मा. संजीव भारद्वाज यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले योग शिक्षक श्‌ सुदर्शन सोवितकर आणि प्रिती सोवितकर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील शिक्षकांनी योगासने आणि प्राणायाम केले. तर शाळेतील विद्यार्थ्यांनी ऑनलाईन माध्यमातून योगासनाचे थेट प्रक्षेपण पाहून योगासने केली. सूत्रसंचालन शिक्षिका अश्विनी जाधव यांनी केले.शाळेचे उपप्राचार्य मुकुंदराज हुंबे, शेख वहिद आणि संतोष दिपके



हिंगोली शहरातील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये जागतिक योगदिनानिमित्त योगासनाचे धडे देण्यात आले. यावेळी उपस्थित शिक्षक व पालक.

### आनंददायी जीवनासाठी योगासने नियमितपणे

**हिंगोली :** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्राचार्य संजीव भारद्वाज यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, सर्वांनीच आनंददायी जीवन जगण्यासाठी नियमित योगासने करावीत. योगासनामुळे मनावर आणि शरीरावर नियंत्रण मिळवता येते. ज्ञान, प्रेम, करुणा, वात्सल्य आणि सामर्थ्य हे सारे गुण योगातून विद्यार्थ्यांना प्राप्त करता येतात.

योग दिवसानिमित्त विद्यार्थ्यांना योगासने आणि योगाचे महत्व कळावे यासाठी योगा प्रश्नावलीचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते.

योग शिक्षक सुदर्शन सोवितकर, प्रीती सोवितकर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील शिक्षकांनी योगासने आणि प्राणायाम केले. तर शाळेतील विद्यार्थ्यांनी ऑनलाईन माध्यमातून योगासनाचे थेट प्रक्षेपण पाहून योगासने केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका अश्विनी जाधव यांनी केले. शाळेचे उपप्राचार्य मुकुंदराज हुंबे, शेख वहिद, संतोष दिपके यांच्यासह शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Hello Hingoli

# विद्यार्थ्यांसाठी पुस्तके ठरतात प्राणवायू : प्राचार्य भारद्वाज




**हिंगोली/प्रतिनिधी** : पुस्तके विद्यार्थ्यांसाठी प्राणवायू म्हणून कार्य करतात. पुस्तके विद्यार्थ्यांचे खरे मित्र असतात. ते सदैव विद्यार्थ्यांना साथ देतात आणि जीवन जगण्याची नवी दिशा दाखवतात. 'असे प्रतिपादन शाळेचे प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज यांनी शनिवारी येथे केले.

पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये राष्ट्रीय वाचन दिवस शनिवारी उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय वाचन दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शाळेच्या ग्रंथालयाला पुस्तके दान म्हणून दिली. यावेळी शाळेतील ग्रंथालयात शिक्षकांनी पुस्तक वाचन करून आपले वाचन अनुभव सांगितले.

श्री. पी.एन. पन्नीकर यांनी 'Read and Grow' हा ग्रंथ वाचन करण्याचा संदेश देऊन लाखो लोकांना ग्रंथ वाचण्यास प्रेरित केले.त्यांचा स्मृतीदिन १९ जून हा दिवस भारतात राष्ट्रीय वाचन दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

राष्ट्रीय वाचन दिवस साजरा करतांना शिक्षकांनी शाळेच्या ग्रंथालयातील बोधकथा, अनमोल गोष्टी, आत्मचरित्र, इतिहास, राज्यशास्त्र, विज्ञान यासह विविध विषयावरील पुस्तकांचे वाचन केले. एक चांगला वाचक एक चांगले व्यक्तिमत्त्व विकसित करत असतो.

पुस्तके आपल्याला ज्ञान देतात आणि ते आपल्याला योग्य नैतिक सल्ला देतात. चांगली पुस्तके वाचून आपण सदाचाराचे आचरण करण्यास शिकतो आणि सदाचारी आचरणाने आपले व्यक्तिमत्त्व सर्वांगाने विकसित होत असल्याचे प्राचार्य भारद्वाज यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी कोणते पुस्तकांचे वाचन करावे याबद्दल बोलतांना ते म्हणाले की ' बालकांनी बोधकथा, पक्षी आणि प्राणी या विषयावरील चित्ररूप पुस्तके, छान छान गोष्टी, थोर महापुरुषांच्या बालपणीच्या आठवणीचे पुस्तके वाचावीत. तसेच मुलांनी छोटी छोटी पुस्तके, मनोरंजन, चरित्र, बालकथा, बालसाहित्य, नीतीकथा, भारतीय लोककथा, नीतिमत्तेच्या कथा, इसापनीती, अनमोल गोष्टी,अकबर आणि बिरबलच्या गोष्टी, अरेबियन बालकथा, तेनालीरामच्या गोष्टीचे वाचन करणे गरजेचे आहे.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील ग्रंथपाल चंद्रकांत नांगरे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.






Since 1927
PODAR INTERNATIONAL SCHOOL
MORE THAN GRADES
Since 1927


# चला मुलांनो.. पुस्तके वाचूया आणि जीवन घडवूया

भारतीय वाचन दिवस

देशातील प्रत्येक नागरीकाने ग्रंथाचे वाचन केले पाहिजे. दर्जेदार आणि चांगल्या ग्रंथ वाचनाने सुसंस्कारशील जीवन जगण्याचे ज्ञान मिळते. नागरीकांच्या संस्कारशील आणि सदाचारी आचरणातून देशाचा सर्वांगीण विकास होत असतो. श्री. पी.एन .पैनीकर यांनी 'Read and Grow' हा ग्रंथ वाचन करण्याचा संदेश देऊन लाखो लोकांना ग्रंथ वाचण्यास प्रेरित केले. त्यांचा स्मृतीदिन १९ जून हा दिवस भारतात राष्ट्रीय वाचन दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.



ग्रंथ संस्काराची खाण । ग्रंथ जीवनाचा प्राण ॥

ग्रंथ सांगती ज्ञान । विश्वासाठी ॥

ग्रंथ युगाची भाषा । ग्रंथ हातावरची रेषा ॥

ग्रंथ दाखवती दिशा । अंधारातही ॥

ग्रंथ वाचनाचे महत्व सांगणारी अशी रचना प्रा. विलास वैद्य यांनी अत्यंत समर्पक शब्दात केली आहे. ग्रंथातून मिळणारे ज्ञान आपल्या अंधाऱ्या जीवनाला प्रकाशमय करते म्हणून विद्यार्थ्यांनी ग्रंथ वाचन आवर्जून केले पाहिजे.

'मानवी जीवनात ज्ञान, शिक्षण आणि संस्कृती विषयक मूल्यांचा प्रसार करणाऱ्या साधनात ग्रंथ अग्रेसर आहेत. व्यक्तिचे जीवन समृध्द करण्यात व देशाचा विकास साधण्यात त्यांचा सहभाग असतो.' असे ग्रंथाबाबत युनेस्कोने म्हटले आहे. युनेस्कोने वाचनवृद्धी आणि वाचन संवर्धनासह वाचन संस्कृतीचा प्रसार करण्यात मौलाचे कार्य केले आहे.

आजच्या स्पर्धेच्या आणि अत्याधुनिक युगात देखील ग्रंथाचे महत्व अनन्यसाधारण आहे. आयुष्यातील यशाचा मार्ग ग्रंथ वाचनातूनच जात असतो. जीवनात ग्रंथ वाचनामुळे नव- नवीन आणि सर्वोत्तम मार्ग दिसतात. नकारात्मकतेकडून सकारात्मक जीवन जगण्याची दिशा मिळते. ग्रंथातूनच जीवनात मोठा आधार आणि मनोबल मिळते. ग्रंथच आपल्या जीवनाचे खरे मित्र असतात. ते आपल्याला सदैव साथ देतात, मार्गदर्शन करतात, जीवनात यशाची गुढी उभारण्यास मदत करतात. जीवनाला वैचारिक पाठबळ देतात आणि या धावत्या जगात कसे जगायचे ते शिकवतात. ग्रंथ हे प्राणवायू प्रमाणे आपल्याला क्षणा-क्षणाला साथ देतात आणि जीवनातील मर्म सांगतात. म्हणूनच बालकांनो.. चला पुस्तके वाचूया आणि जीवन घडवूया.

शाळा ही सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडवणारी एक संस्कारशील सामाजिक संस्था म्हणून कार्य करत असते. जीवनात कसे वागावे, चालावे आणि बोलावे या शिष्टाचाराचे शिक्षण विद्यार्थ्यांना शाळेतूनच मिळत असते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, उच्च शिक्षणाची आणि २१ व्या शतकातील सक्षम नागरिक घडवणारी कला कौशल्य गुण शालेय शिक्षणातूनच मिळत असतात. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाच्या पुस्तकांसह जीवन घडवणाऱ्या साहित्यिक पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. विद्यार्थ्यांचा सर्वात जवळचा मित्र म्हणजे ग्रंथ असून ग्रंथ वाचनामुळे ज्ञानात भर पडते. वाचनामुळे शब्द संपत्ती वाढते.शब्द संपत्तीचा उपयोग निबंध, लेखन आणि भाषणासाठी करता येतो आणि त्यामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व फुलण्यास मदत होते. तसेच ग्रंथ वाचनातूनच लेखकांच्या कथा, कादंबऱ्या, लेख आणि कविता यांची माहिती मिळून जीवन जगण्याचे जीवनामृत मिळते.

माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम म्हणतात की, 'एक पुस्तक शंभर मित्रा समान असते.' आपले खरे मित्र जसे आपल्याला सदैव साथ देतात त्याप्रमाणे पुस्तके हे जीवनाचा मार्ग दाखवून आपल्याला सदैव साथ देतात, मदत करतात. म्हणून विद्यार्थी मित्रांनो पुस्तकांचे वाचन करून स्वतःचे जीवन घडवावे. विद्यार्थ्यांनी स्वतःला ज्ञान मिळवण्यासाठी, जगात घडणाऱ्या दैनंदिन घडामोडींची माहिती मिळवण्यासाठी, योग्य मार्गदर्शन, संस्कारशील शिक्षण घेण्यासाठी, महापुरुषांच्या जीवनचरित्रातून प्रेरणा घेण्यासाठी, आणि स्वतःचे व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी पुस्तकांचे वाचन केले पाहिजे.

'Reading makes a man perfect' असे फ्रांसिस बेकन या प्रख्यात विचारवंताने म्हटले आहे. पुस्तक वाचनाने मनुष्य परिपूर्ण होतो. वाचन ही आजच्या काळाची खरी गरज आहे. ज्ञानाधिष्ठित समाज निर्माण होत आहे. आज ज्ञान ही शक्ती म्हणून उदयास येत आहे. बालकांनी स्वतःला वाचनाचा छंद लावून संस्कारशील आणि ज्ञान वृद्धिंगत करणाऱ्या पुस्तकांचे वाचन करावे.

बालकांनी बोधकथा, पक्षी आणि प्राणी या विषयावरील चित्ररूप पुस्तके, छान छान गोष्टी, थोर महापुरुषांच्या बालपणीच्या आठवणींचे पुस्तके वाचावीत. तसेच मुलांनी छोटी छोटी पुस्तके, मनोरंजन, चरित्र, बालकथा, बालसाहित्य, नीतीकथा, भारतीय लोककथा, नीतिमत्तेच्या कथा, इसापनीती, अनमोल गोष्टी,अकबर आणि बिरबलच्या गोष्टी, अरेबियन बालकथा, तेनालीरामच्या गोष्टी अशा बालसाहित्याचे वाचन केले पाहिजे.

शिक्षण हा विद्यार्थी जीवनाचा अविभाज्य अंग असून ग्रंथ हे हृदय आहे. भाषेच्या आकलनासाठी, उच्चार, व्याकरण, संदर्भ, अर्थ, ध्वनी आणि उत्तम संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी मुलांनी पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. मोठ्या मुलांनी शैक्षणिक, वैचारिक, जीवन चरित्र, संस्कारमय, बोधप्रत, धार्मिक, सुसंस्कारी प्रेरणादायी देणाऱ्या पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, केशवसुत, बा. सी. मर्ढेकर, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, ग्रेस, बहिणाबाई चौधरी, शांता शेळके, इंदिरा संत, नारायण सुर्वे, विठ्ठल वाघ, नामदेव ढसाळ, वसंत आबाजी डहाके, फ.मु. शिंदे, जगदीश कदम, इंद्रजित भालेराव, प्रा. विलास वैद्य, अशोक अर्धापूरकर या सारख्या कवी आणि साहित्यकारांच्या पुस्तकांचे विद्यार्थ्यांनी वाचन केले पाहिजे.

शिवाजी महाराज, संभाजी महाराज, सयाजीराव गायकवाड, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, पंडित नेहरु यांपासून ते डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, विक्रम साराभाई तसेच विल्यम शेक्सपियर, डॉ. वर्गीस कुरियन, डॉ. कार्व्हर, जॉर्जबुश वाशिंग्टन,बुकर टि. वाशिंग्टन, अब्राहम लिंकन, बराक ओबामा, चेतन भगत, अरविंद अडिगा, तस्लिमा नसरीन, यांच्यापासून ते आजच्या काळातील प्रसिद्ध राजकारणी, वैज्ञानिक, उद्योजक, डॉक्टर आणि शिक्षक यांच्या जीवनचरित्रात्मक पुस्तकांसह त्यांच्या वैचारिक पुस्तकांचे वाचन केले पाहिजे.

विद्यार्थ्यांनी दर्जेदार आणि प्रेरणादायी पुस्तकांचे वाचन करावे. यश तुमच्या हातात -शिव खेरा, यु कॅन विन -शिव खेरा, जगा पण सन्मानाने -शिव खेरा, एक होता कार्व्हर -वीणा गवाणकर,

अग्निपंख -अब्दुल कलाम, खरे खुरे आयडॉल -युनिक फिचर्स, किमयागार - अच्युत गोडबोले, स्टीव्ह जॉब्स -अच्युत गोडबोले आणि प्रज्वलीत मने -डॉ. कलाम यासारखी प्रेरणादायी पुस्तकांचे विद्यार्थ्यांनी वाचन करावे.

'वाचाल तर वाचाल ' असे ग्रंथ वाचनाबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. त्यांनी ग्रंथासाठी घर बांधले आणि त्यात जवळपास बावीस हजारापेक्षा जास्त ग्रंथाचा संग्रह केला होता. त्यांना बालपणापासूनच ग्रंथवाचनाची अत्यंत आवड होती. ते बालपणापासूनच विविध विषयावरील ग्रंथांचे बारकाईने वाचन करत असत.



परदेशात शिक्षण घेत असतांना ते ग्रंथालयात जाऊन ग्रंथालय बंद होईपर्यंत ग्रंथाचे वाचन करत असत. एकदा ते म्हणाले होते की, ' तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एका रुपयाची भाकरी घ्या आणि एका रुपयाचे पुस्तक घ्या. कारण भाकरी तुम्हाला जगायला मदत करेल तर पुस्तक कसे जगायचे ते शिकवेल. '

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापुरुषाकडून पुस्तक वाचनाची प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त पुस्तकांचे वाचन करून आपले जीवन समृध्द करावे.


**चंद्रकांत गौतम नांगरे**

**ग्रंथपाल**

**पोदार इंटरनॅशनल स्कूल, हिंगोली**

# पोद्दार शाळेत पर्यावरणपूरक पेपरबॅग दिवस साजरा

हिंगोली/प्रतिनिधी

येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये पेपरबॅग दिवस ऑनलाईन माध्यमातून साजरा करण्यात आला होता.दि. ३ जुलै हा दिवस पेपर्स बॅग दिवस म्हणून साजरा केला जातो. जगभर प्लास्टिक बॅगसह विविध प्लास्टिकच्या वस्तू वापरण्याचे प्रमाण वाढत आहे. प्लास्टिकमुळे प्रदूषण देखील वाढत आहे. म्हणूनच पर्यावरणासाठी घातक ठरणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर बंद व्हावा यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येत आहे. प्लास्टिकला पर्याय म्हणून कागदी पिशव्यांचा वापर सुरु होत आहे.प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर थांबवून कागदी पिशव्यांचा वापर करावा.शालेय विद्यार्थ्यांनी देखील प्लास्टिकचा वापर न करता पेपर बॅगचा वापर करावा याबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी पेपर बॅग दिवस साजरा करण्यात येत आहे. असे प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज यांनी सांगितले.यावेळी शाळेतील



विद्यार्थ्यांना सुंदर आणि आकर्षक पेपरबॅग बनवल्या होत्या.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.






दैनिक मराठवाडा केसरी


# पोदार मध्ये ऑनलाइन पेपरबॅग दिवस साजरा




**हिंगोली / प्रतिनिधी :** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये पेपरबॅग दिवस ऑनलाईन माध्यमातून साजरा करण्यात आला .

आज जगभर प्लास्टिक बॅगसह विविध प्लास्टिकच्या वस्तू वापरण्याचे प्रमाण वाढत आहे. प्लास्टिकमुळे प्रदूषण देखील वाढत आहे. म्हणूनच पर्यावरणासाठी घातक ठरणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर बंद व्हावा यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येत आहे. प्लास्टिकला पर्याय म्हणून कागदी पिशव्यांचा वापर सुरु होत आहे. प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर थांबवून कागदी पिशव्यांचा वापर करावा.

शालेय विद्यार्थ्यांनी देखील प्लास्टिकचा वापर न करता पेपर बॅगचा वापर करावा याबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी पेपर बॅग दिवस साजरा येत असल्याचे प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांनी सांगितले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी आकर्षक पेपरबॅग बनवल्या होत्या. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.






Since 1927
PODAR
INTERNATIONAL SCHOOL
MORE THAN GRADES
Since 1927


# पोदार मध्ये जागतिक संगीत दिवस उत्साहात साजरा

**हिंगोली/प्रतिनिधी** : येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये जागतिक संगीत दिवस गुरुवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शिक्षकांनी विविध गाणे सादर करीत आनंद लुटला.




आपले जीवनच संगीताच्या सप्तसुरांनी व्यापले आहे. संगीतामुळे आयुष्यात नवचैतन्य संचारते. वसुंधरेच्या प्रत्येक कणाकणात संगीत सामावले आहे. आज संगीत सर्वांच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक बनला आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षणा–क्षणावर संगीत मानवासोबत असते. संगीत तुमचे आयुष्य बदलू शकते. संगीत तुमच्या जीवनास एक नवा आकार आणि एक नवी उमेद देते. संगीत हे मांगल्याचे प्रतीक असून तान – ताणतांनावाच्या काळात मनुष्य संगीताचा आधार घेऊन नव्या उमेदीने जीवन जगतो. संगीतामध्ये काही नवीनच जादू असते. संगीताच्या तालावर मनुष्य प्रेरणादायी विचार आत्मसात करू शकतो. जीवनाच्या प्रत्येक वळणावर संगीत आपल्याला जगायला शिकविते असे प्रतिपादन प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांनी केले.

संगीत शिक्षक निकेश यरमळ आणि प्रयाग मोटघरे, किरण जोगी, प्रतीक बोराळकर, नितीन इंगोले, मनीषा पाटील, संतोष दिपके, शेख वहिद यानी विविध हिंदी गीत सादर करून सकारात्मक जीवन जगण्याचा संदेश दिला.





हिंगोली
Email : daily.marathwadakesri@gmail.com
शुक्रवार
02.07.2021
04

# विद्यार्थ्यांनी डॉक्टरापासून प्रेरणा घेऊन जीवनात डॉक्टर व्हावे - प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज

हिंगोली/प्रतिनिधी : डॉक्टर्स आपल्या ज्ञान, चिकित्सक वृत्ती व प्रयत्नांतून मरणाच्या दारात असणाऱ्या असंख्य रुग्णांना जीवनदान देतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी देवदूता प्रमाणे कार्य करणाऱ्या डॉक्टरपासून प्रेरणा घेउन जीवनात डॉक्टर बनावे असे प्रतिपादन प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांनी डॉक्टर डे निमित्य येथे केले.



येथील पोदर इंटरनॅशनल स्कूलमध्ये राष्ट्रीय डॉक्टर दिवसाचे अवचित्य साधून गुरुवारी डॉक्टर डे ऑनलाईन साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

भारताचे प्रसिध्द डॉ.विधान चंद्र रॉय यांच्या कार्याच्या सन्मानार्थ नॅशनल डॉक्टर्स दिवस साजरा करण्यात येतो . भारतात डॉक्टरांना देवाचे रूप मानले जाते . अमूल्य आणि अनमोल जीवनात रुग्णांना वेळो वेळी औषधी देऊन त्यांचा जीव वाचवण्याचा प्रयत्न करतात . डॉक्टर्स आपल्या ज्ञान , चिकित्सक वृती आणी प्रयत्नातून मरणाच्या वाटेवर आसणार्या असंख्य रुग्णांना जीवनदान देतात . त्याची एक झलक कोरोना काळात दिसून येत आहे . कोरोना व्हायरस कालावधीत आज डॉक्टर्स विश्र्वाचे रक्षक बनून कार्य करतांना दिसत आहेत .राष्ट्रीय डॉक्टर दिवस हा डॉक्टर आणि आरोग्य सेवेला समर्पित दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

कोरोनाच्या जागतिक महामारीने सर्व जगभरात हाहाकार उठवला होता. त्यावेळी डॉक्टर आणि आरोग्यसेवेतील कर्मचारी यांनी अहोरात्र प्रयास करून लाखो लोकांचे प्राण वाचवले. कोरोना योद्धा डॉक्टरांच्या त्यागाची , आत्मसमर्पण आणि कार्याची प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी जीवनात देवदूताप्रमाणे कार्य करणारे डॉक्टर होण्याचे ध्येय ठरवावे. डॉक्टर हे आजच्या काळातील खरे हिरो आहेत. ' असे प्रतिपादन प्राचार्य संजीवकुमार भारद्वाज यांनी डॉक्टर दिनानिमित्त बोलतांना केले .

यावेळी डॉ. नंदनी भगत, डॉ.काबरा डॉ. स्वाती गुंडेवार यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय डॉक्टर डे ची थीम ' फॅमिली डॉक्टरसमवेत फ्युचर बनविणे 'ही असून सर्व शाळेतील विद्यार्थ्यांसाठी 'डॉक्टर रोल प्ले, डॉक्टरांना धन्यवाद देणारे पत्र लेखन, मी डॉक्टर झालो तर या विषयावर निबंध लेखन अश्या विविध स्पर्धा ठेवण्यात आल्या होत्या त्यास विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. कार्यक्रम यशस्वी तेसाठी शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी परिश्रम घेतले.





# हेलन केलर : अंधबधिरांची माऊली

जीवनातील सर्व सुंदर गोष्टींचा आस्वाद घेण्याचा हक्क अपंगांनाही आहे. दुय्यम दर्जाच्या गोष्टींवर त्यांनी समाधान मानण्याचे कारण नाही, असे ठामपणे साऱ्या विश्वाला हेलन केलर यांनी ठणकावून सांगितले होते आणि त्यांनी अंध-मूकबधिरांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी जीवनभर प्रयत्न केले.

हेलन केलर यांनी आपल्या अंधबधिर शारीरिक व्यंगावर विजय मिळवून दुसऱ्यांच्या कल्याणासाठी अहोरात्र कार्य केले. शेकडो अंध-अपंगांच्या जीवनात उज्ज्वल, चैतन्यमय प्रकाश निर्माण केला. अमेरिकेत सर्वाधिक लोकप्रिय स्त्रियांमध्ये त्यांचे नाव घेतले जाते. अंध-अपंगांना न्याय आणि समान हक्क मिळावे म्हणून त्यांनी अपार कष्ट केले. त्यांनी स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. एक उच्च प्रतिभेची लेखिका म्हणून त्यांनी लेखन केले.

२७ जून १८८० साली हेलन केलरचा जन्म टस्कम्बिया अलाबामा येथे झाला. हेलन बालपणी गोड आणि खेळकर मुलगी होती. पण १८८२ साली ती आजारी पडली. त्या आजारपणात तिची दृष्टी, श्रवणशक्ती आणि वाचाशक्ती देखील कायमची बंद पडली. त्या आजाराने तिचे संपूर्ण आयुष्यच बदलून गेले. एका हसत्या खेळत्या मुलीचे रूपांतर हट्टी, जिद्दी एकलकोंडी, भांडखोर आणि कुणाचेही न ऐकणाऱ्या मुलीत झाले. सारे आयुष्य अंधकारमय झाले.

**शिकण्याची जिद्द :** हेलनला शिकवले पाहिजे असे तिची आई केटी अॅडम्स केलर यांना मनोमन वाटत होते. म्हणून त्यांनी आपल्या मुलीला शिक्षण देण्यासाठी प्रसिद्ध शास्त्रज्ञ अलेक्झांडर ग्रॅहम बेल यांना पत्र लिहून मदत करण्याची याचना केली. ग्रॅहम बेल यांनी बोस्टनमधील पर्किन्स इन्स्टिट्यूटशी संपर्क साधून १८८७ साली अॅन सलिव्हन यांना हेलनला शिक्षण देण्यासाठी बोलावून घेतले.



अॅन सलिव्हनने अंत्यत कठीण परिस्थितीत घसलेल्या हेलनला शिकवण्यासाठी जीवाचे रान केले. तिला जगण्याची नवी दिशा, नवा आत्मविश्वास दिला. सन्मानाने जगण्यासाठी प्रेरित केले. हेलनला बोलता, वाचता व लिहता यावे यासाठी अॅनने विविध शैक्षणिक प्रयोग केले. बोटांनी वाचून बोलण्याची कला तिने प्रयत्नपूर्वक आत्मसात केली. ब्रेल लिपीही ती दहाव्या वर्षीच शिकली. कुठलीही गोष्ट आत्मसात करण्याचा तिचा आवाका विलक्षण होता. येणाऱ्या अनेक अडचणींवर मात करत ती टाइपरायटर चालवायला शिकली.

१८८९ ते १८९१ च्या दशकात हेलनने पर्की आणि इन्स्टिट्यूटमध्ये अभ्यास करून अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यानंतर हेलन आणि अॅन न्यूयॉर्कला गेल्या. तिथे त्यांनी राईट ह्युमेसन स्कूलमध्ये शिक्षण घेतले. त्या दोघी १८९६ साली केंब्रिज गेल्या. तिथे हेलनने रॅडक्लिफ कॉलेज मध्ये बी. ए. ची पदवी मिळविण्याकरिता वाचनालयात आणि घरी बसून अभ्यास केला. इंग्रजी साहित्य, परदेशी भाषा आणि इतिहास या विषयाचा सखोल अभ्यास केला. १९०४ मध्ये तिने बी. ए. ची पदवी संपादन केली. बी. ए. ची पदवी संपादन करणारी अंधबधिर मुलगी म्हणून प्रथम होती.

१९०६ साली मॅसेच्युसेट्स स्टेट फॉर ब्लाइंडची सदस्य होऊन हेलनने अंध अपंगांना चांगली वागणूक मिळावी व चांगल्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून प्रचार कार्य केले. १९०९ मध्ये त्यांनी समाजवादी पक्षात सहभाग घेतला. हेलनने स्त्रीमुक्ती, संततीनियमन, नागरी हक्क, कामगार कल्याण कार्यात प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. महिला आणि कामगारांच्या हक्कांसाठी तिने आपल्या लेखणीतून लढा दिला होता. समाजवादी तत्त्वज्ञानावर तिचा प्रगाढ विश्वास होता. समतेच्या, मानवतेच्या वाटेवर ती आयुष्यभर चालत राहिली आणि लोकांना त्या वाटेवर चालण्यास त्यांनी प्रेरित केले. एकट्याने कार्य करण्यापेक्षा एकत्र येऊन महान कार्याची उभारणी करावी, असा तिचा जगाला मोलाचा संदेश आहे. आदर्श व्यक्तींना समोर ठेवावे. आपल्या असण्याचा शोध जाणीवपूर्वक घ्या, असे हेलन नेहमीच म्हणत असत. १९११ साली जागतिक पहिले महायुद्ध सुरू झाले. त्या युद्धास हेलनने तीव्र विरोध केला. युद्ध व शस्त्रावर पैसा खर्च करण्यापेक्षा शांततामय मार्गाने अंध -अपंगांच्या कल्याणासाठी खर्च करावा म्हणून ती अमेरिकेत चाललेल्या युद्ध विरोधी चळवळीत सहभागी झाली होती.

अमेरिकन फाऊंडेशन फॉर द ओव्हर सीज ब्लाइंडच्यावतीने हेलन आणि पॉल यांनी सर्व जगभर फिरून अंध व्यक्तींच्या गरजा आणि त्यांच्या प्रश्नांबद्दल व्याख्याने दिली. अमेरिकन फाऊंडेशन 'गार्डियन अंजल ऑफ द ब्लाइंड' या संस्थेने 'अंधांची माऊली' हा बहुमान हेलन केलरला बहाल केला. १९३९ ला दुसरे महायुद्ध सुरु झाले. दुसऱ्या महायुद्धाला देखील विरोध करून शांततामय सहजीवनाच्या विचाराचा जगभर प्रसार केला. दुसऱ्या युद्धात जखमी झालेल्या शेकडो सैनिक आणि नागरिकांना जीवन जगण्याची प्रेरणा देण्यासाठी हेलन जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी या अणुबॉम्ब हल्ल्यात बेचिराख झालेल्या शहरात जाऊन तेथील सैनिक आणि नागरिकांना त्यांनी मदत केली.

एक सर्वोत्तम लेखिका म्हणून त्यांनी अनेक लेख लिहिले आणि १२ पुस्तके लिहिली होती. दी स्टोरी ऑफ माय लाईफ (१९०३) आणि दी वर्ल्ड आय लिव्ह इन (१९०८) अशी प्रसिद्ध पुस्तके देखील त्यांनी लिहिली आहेत. त्यामध्ये त्यांनी आपला जीवन संघर्ष वर्णन केला आहे. १९६० साली हेलनला हृदयविकाराचा झटका आला त्यामुळे ती आजारी पडली. त्या आजारपणामुळे तिचा जगाशी संपर्क तुटत गेला आणि १९६८ मध्ये त्यांचा शांतपणे मृत्यु झाला. सर्वांशी आदर, प्रेम आणि गौरव संपादन केलेली ती एक महान आणि कर्तृत्वान स्त्री होती. जगभरातील अंध -अपंग व्यक्तींच्या जीवनात जगण्याची नवी दिशा मिळावी, त्यांना मान -सन्मान मिळावा, न्याय मिळावा, सर्वांसारखे मुक्त आणि नैसर्गिक जीवन जगता यावे यासाठी हेलने सर्व जगभर फिरून अपार कष्ट केले आणि त्यांनी अंध -अपंगांच्या जीवनात नवा देदीप्यमान प्रकाश निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

बालवाचकांनी हेलन केलर यांचे जीवन चरित्र आणि त्यांच्या विचारावरील पुस्तकांचे वाचन करावे. त्यांच्या संघर्षमय जीवनापासून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनात येणाऱ्या संकटावर मात करावी. आपले जीवन यशस्वी करावे.


**चंद्रकांत गौतम नांगरे**
प्राचार्य
पोद्दार इंटरनॅशनल स्कूल,
हिंगोली



# media coverage

PODAR INTERNATIONAL SCHOOL
MORE THAN GRADES
Since 1927

**2021-22**



**हिंगोली शहरातील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये जागतिक योगदिनानिमित्त योगासनाचे धडे देण्यात आले. यावेळी उपस्थित शिक्षक व पालक.**

यावेळी पोस्टमास्तर आर. डी. बगाटे, प्रकाश माऊलंगे, उमेश कोरडे, संदीप संघई, संजय निर्मल, अनिक नलबंड, अमोल दराडे, बी. जी. इंगोले यांची उपस्थिती होती.

**आनंददायी जीवनासाठी योगासने नियमितपणे**

**हिंगोली :** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्राचार्य संजीव भारद्वाज यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, सर्वांनीच आनंददायी जीवन जगण्यासाठी नियमित योगासने करावीत. योगासनामुळे मनावर आणि शरीरावर नियंत्रण मिळवता येते. ज्ञान, प्रेम, करुणा, वात्सल्य आणि सामर्थ्य हे सारे गुण योगातून विद्यार्थ्यांना प्राप्त करता येतात.

योग दिवसानिमित्त विद्यार्थ्यांना योगासने आणि योगाचे महत्त्व कळावे यासाठी योगा प्रश्नावलीचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते.

योग शिक्षक सुदर्शन सोवितकर, प्रीती सोवितकर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील शिक्षकांनी योगासने आणि प्राणायाम केले. तर शाळेतील विद्यार्थ्यांनी ऑनलाईन माध्यमातून योगासनाचे थेट प्रक्षेपण पाहून योगासने केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका अश्विनी जाधव यांनी केले. शाळेचे उपप्राचार्य मुकुंदराज हुंबे, शेख वहिद, संतोष दिपके यांच्यासह शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Hello Hingoli
Page No. 3 Jun 22, 2021
Powered by: erelego.com





## अवतीभवती



हिंगोली : पोदारमध्ये सावरकर जयंती साजरी करण्यात आली.

# पोदारमध्ये सावरकर जयंती साजरी

**हिंगोली :** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती साधेपणाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज, मुकुंदराज हुंबे, अमोल शेष, आनंद देऊळकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.तसेच शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सावरकर यांच्या जीवनावरील गीत गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यास शाळेतील विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला होता.

सकाळ

# व्हर्च्युअल टूर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची ऑनलाइन सहल

**हिंगोली, ता. २८ (बातमीदार) :** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये व्हर्च्युअल टूर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची ऑनलाईन आनंददायी सहल घडवण्यात आली.

यावेळी प्राचार्य संजीव कुमार भारद्वाज म्हणाले की, ''पोदार शाळेने प्रथमच व्हर्च्युअल टूर्सच्या द्वारे विद्यार्थ्यांसाठी आनंददायी सहल घडवून आणली. विद्यार्थी मोठया आनंदाने या ऑनलाईन सहलीत सहभागी झाले होते. जगातील विविध महत्वपूर्ण आणि मनोरंजक स्थळाचे ऑनलाईन दर्शन घडवून आणण्यात आले होते.

ऑनलाईन टूर्स मध्ये हिंगोली ते दिल्ली या टूर्समध्ये हिंगोलीपासून दिल्लीला कसे जायचे याचे मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच दिल्लीमधील महत्वपूर्ण सहलीचे स्थळ, लाल किल्ला, संसद भवन यासारखे महत्वाचे स्थळ विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले.



हिंगोली : व्हर्च्युअल टूर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची ऑनलाइन आनंददायी सहलीत वेरूळ येथील लेणी दाखविण्यात आली.

युनेस्कोद्वारे हंपी या गावाला जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित करण्यात आले आहे. हंपी हे एक जागतिक वारसा स्थळ येथील पुरातन वास्तू,पर्यटकांच्या गर्दीने भरून गेलेल्या बाजारपेठा,सुंदर व भव्यदिव्य मंदिरे,उंच व मोठमोठे शिलाखंड असलेल्या टेकड्या,शांत व निर्मळ पाण्याची तुंगभद्रा नदी हे सर्व ऑनलाईन पाहिल्यानंतर विद्यार्थी फारच भावुक आणि उत्साहित झाले होते.

सह्याद्री डोंगररांगांच्या कुशीत वसलेल्या अजिंठामधील रंगीत चित्रे, वेरूळमधील मूर्ती आणि एलिफंटा गुंफांमधील दैवी या लेण्या जगप्रसिद्ध पाहून विद्यार्थी भारावून गेले होते.

अश्या नयनरम्य आणि ज्ञानवर्धक पर्यटन स्थळ ऑनलाईन माध्यमातून दाखविण्यात आले.

Nanded, Hingoli-Today1
29/05/2021 Page No. 2

Mr.S.K Bhardwaj, Principal
Mr.Mukundraj Humbe -Senior Coordinator
Mr.Amol Shesh - Coordinator
Mr. Santosh Dipke - Event Coordinator
Mr.V.H.Reddy- A.O.
Mrs.Mohini Dixit - FD
Mr.Chandrakant Nangare -
Media Coverage Coordinator

Thank You

*Media coverage is mirror of the school.*